२ मोल

सं.क्र. ९

# कर्मयोग

१९५००

अनु० - 42

३५८

( श्रीमद्विवेकानंदस्वामी )

# कर्मयोग.

केरळकोकिळचे एडिटर,

ह्यांनीं

मराठींत लिहिला.

जनार्दन महादेव गुर्जर,

ह्यांनीं

मुंबईंत,

जावजी दादाजी यांच्या

"निर्णयसागर" छापखान्यांत छापविला.

सन १९००.

किंमत ८ आणे.

एकं सद्विप्रा बहुधा वदंति ।

(सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें राखले आहेत.)

आलें पाहिजे. पण त्याचा जेव्हां आपण सूक्ष्मविचार करूं लागतों, तेव्हां आपणांस दिसून येतें कीं, जगाला आपल्या मदतीची मुळींच गरज नाहीं. तुह्मी किंवा मी येऊन त्यास मदत करावी ह्मणून कांहीं जग केलेलें नाहीं. एकदां एका पुराणांत मीं असें वाचलें कीं "हें सारें जग अतिशय सुंदर असून फार चांगलें आहे. कारण त्यानें आपणांस इतरांस मदत करण्याची संधि व फायदा दिला आहे." लौकिकरीत्या हें वाक्य मोठें गोड दिसतें. पण विचाराअंतीं असें ह्मणणें हें अगदींच गैरशिस्त होय. कारण, जग आमच्या मदतीची अपेक्षा करितें असें ह्मणणें, ही ईश्वराची निंदा नव्हे काय? जगामध्यें दुःख भरलेलें आहे, हें कांहीं आमच्यानें नाहीं ह्मणवत नाहीं. ह्याकरितां त्यांतून पार पडून दुसऱ्यास मदत करणें, हा श्रेष्ठ गुण—आपण दुसऱ्यास मदत करितों ती कालांतरानें आपली आपल्यास केल्याचें आपणांस आढळून येतें तरी,—आपण संपादला पाहिजे. मी लहान असतां माझ्यापाशीं कांहीं पांढरे उंदीर होते. ते

चालेल ह्याविषयीं आह्मीं सर्वांनीं पक्की खात्री बाळगावी. आणि त्याला मदत करण्याच्या इच्छेनें आपलें मस्तक तापवूनही पण घेऊं नये. तथापि आपण सत्कृत्य केलें पाहिजे. दुसऱ्यास मदत करण्याचा आपला हक्क आहे हें जर आपण सदोदित मनांत वागविलें, तर अत्यंत श्रेष्ठ नैतिक सामर्थ्य जें "सत्कर्माचरण" तें आपल्या मनांत असतें. उंच जोत्याच्या कांठावर उभें राहून हातीं पैसा दोन पैसे घेऊन "अरे ए भिकाऱ्या! हें घे" असें ह्मणूं नका. एखादा भिकारी आला तर त्याच्या निमित्तानें आपली आपणासच मदत करण्याची संधि त्यानें आणून दिली, ह्मणून त्याचे उपकारी व्हा. तो तृप्त होऊन दुवा देतो, त्या अर्थीं तो घेणारा नव्हे; तर तो देणारा होय. त्यानें आपल्याला जगामध्यें दया आणि परोपकारबुद्धि ह्यांचें सामर्थ्य दाखविण्यास परवानगी दिली व आपणास पवित्र व परिपूर्ण केलें, ह्याबद्दल त्याचे उलट उपकारबद्ध व्हा. सर्व सत्कर्मांच्या अंगीं परिपूर्ण व निर्मल करण्याचा गुण असतो. उत्कृष्ट सत्कर्म असें

काय तें आपणांस करतां येईल. आपण एखादें हास्पितळ बांधूं, रस्ते तयार करूं, किंवा अन्नछत्र उभारूं! आपण दानधर्म करावयाचा मनांत आणून दोन किंवा तीन लक्ष रुपये जमा करून एका लाखांत एक हास्पितळ बांधूं, एक लाख नाचबैठकी करून चैनींत उडवूं; आणखी तिसरा लाख उरला त्यांत अर्धामुर्धा भाग कारभाऱ्यांना चोरावयाला देऊं. आणि अर्धामुर्धा गरीबगुरिबांच्या पदरीं पडेल. हें सारें काय? एक जोराचा वारा आला, तर एका पांच मिनिटांच्या आंत ह्या साऱ्या इमारती जमीनदोस्त करून टाकील. तर मग आह्मीं काय करावें? एखादा ज्वाळामुखीचा स्फोट उसळला तर, त्याच्या आगीच्या लोंढ्याखालीं तुमचें हास्पिटल, शहरें, रस्ते आणि इमारती सारीं वाहून जातील. अशा प्रकारचीं जगाचें हित करण्याचीं मूर्खपणाचीं भाषणें चट सारीं टाकून द्या. जग हें तुमच्या किंवा माझ्या मदतीकरितां खोळंबून बसलेलें नाहीं. तरी आपण कर्म केलें पाहिजे; सतत सत्कृत्यें करीत राहिलें

पाहिजे. कारण, तें आपल्यालाच कल्याणकारक आहे. आपल्याच परिपूर्णतेस पोंचण्याला तेवढाच काय तो मार्ग आहे. ज्याला आपण मदत करतों, तो भिकारी आमची कधींच एक पै सुद्धां देणें लागत नाहीं, तर उलट आपणच त्याचे सर्वस्वी देणेदार होऊन राहतो. कारण, आमच्या दयेची, धर्माची, परोपकाराची कसोटी त्यानें आपल्या स्वतःवर लावून पाहण्यास आह्मांस परवानगी दिली. आह्मीं जगाचें अमुक अमुक हित केलें; किंवा करतों, असें मनांत आणणें, किंवा अमक्या अमक्या कामीं मदत केली असें मानणें, ही निखालस चूक आहे. हे विचार मूर्खपणाचे होत. आणि मूर्खपणाचे विचार ह्मटले कीं, त्यांच्या मागें दुःख हें ठेवलेलें. आपण अमक्या अमक्यास मदत केली आहे, तेव्हां त्यानें आपले उपकार मानावेत असें आपणास वाटतें. आणि त्यानें ते मानले नाहींत कीं, आपणांस दुःख होतें. आपण जें कांहीं करितों, त्याच्या कांहीं तरी मोबदल्याची इच्छा आह्मीं काय ह्मणून ध-

रावी? आपण ज्यावर उपकार करतों, त्याला परमेश्वर असें समजावें, आणि त्याचे आपण उपकारी व्हावें. आपल्या जातिबांधवांवर उपकार करण्याच्या निमित्तानें परमेश्वराची पूजा करण्याचा आपणांस हक्क नाहीं काय? आपण जर अलिप्त राहिलों, तर हीं वायफळ आशेचीं दुःखें विलयास जातील, आणि आनंदानें जग मध्यें कर्म करतां येईल. लिप्त न होतां कर्म केलें ह्मणजे असुख किंवा दुःख कधींच होत नाहीं. जग हें आपल्या सुखदुःखांना घेऊन चाललेलेंच असतें.

एक गरीब मनुष्य होता, त्याला पैशाची अतिशय गरज लागली. त्याला कोणीं सांगितलें कीं भूत किंवा समंध जर वश करून घेतला, तर तो द्रव्य किंवा आपणास जें काय पाहिजे तें आणून देतो. त्यावरून एक समंध वश करून घेण्याचा त्याला मनस्वी नाद लागला. आणि समंध वश करून देणारा मनुष्य कोणि मिळेल, ह्मणून त्याच्या तो शोधास लागला. अखेर त्याला एक मोठा महंत भेटला. तो

मोठा पंचाक्षरी होता. त्यास त्यानें आपणावर उपकार करण्याविषयीं विनंती केली. तो महंत ह्मणाला "तुला समंध घेऊन काय करावयाचें आहे?" त्या मनुष्यानें उत्तर दिलें "मला काम करावयाला समंध पाहिजे. ह्याकरितां तो वश कसा करावा तेवढें आपण कृपा करून सांगा. मला त्याची फारच अवश्यकता आहे." पण महंत ह्मणाला "तूं या भानगडींत पडूं नकोस, घरीं जा." त्याप्रमाणें तो घरीं गेला. पण पुनः दुसऱ्या दिवशीं महंताकडे येऊन समंध देण्याविषयीं मोठ्यानें रडून प्रार्थना करूं लागला. तो ह्मणाला "महाराज! मला एक समंध द्या. मला काम करायाला एक समंध द्याहो!" अखेर त्याच्या त्या जिकिरीला तो महंत कंटाळला आणि ह्मणाला "हा मंत्र घे. याचा जप कर ह्मणजे समंध येईल आणि तूं जें काय त्याला सांगशील तें तो काम करील. पण त्याच्याशीं जपून मात्र वाग. भुतें हीं महाभयंकर असतात. त्यांना सदासर्वदा कामांत गुंतवून ठेविलीं तरच उपयोग. तूं त्याला पळभर जर का रिकामा ठेवलास, कीं त्यानें तुझा जीव घेत-

लाच ह्मणून समज." तो मनुष्य ह्मणाला "हेः! त्यांत काय आहे? तें माझ्या हातचें. मी त्याला इतकें काम देईन कीं, तें त्याच्या साऱ्या जन्माला पुरून उरेल." नंतर तो अरण्यांत गेला. आणि बराच काल तो मंत्र जपल्यानंतर एक मोठा विशाळ, दांत बाहेर काढलेला विक्राळ समंध त्याच्यापुढें येऊन उभा राहिला, आणि ह्मणाला "मी समंध आहें. तुझ्या मंत्रसामर्थ्यानें मी तुला वश झालों आहें. पण मला तूं नेहेमीं काम सांगितलें पाहिजेस. तुझें काम सांगणें बंद पडलें पुरे कीं, मी तत्क्षणीं तुला ठार करीन." तो मनुष्य ह्मणाला "मला आधीं एक राजवाडा बांधून दे पाहूं." हा हुकूम त्या मनुष्याच्या तोंडांतून निघतो न निघतो, तों समंध ह्मणाला "हं! हा बांधला." मनुष्य ह्मणाला "आतां मला द्रव्य आणून दे." समंध ह्मणाला "हं! हें आणलें. पुढें?" मनुष्य ह्मणाला "आतां हें सारें जंगल तोडून येथें शहर वसीव." समंध ह्मणाला "हं! वसविलें! आणखी कांहीं आहे?" तेव्हां तो मनुष्य

अगदीं घाबरून गेला. आणि ह्मणाला "आतां ह्याला सांगावयाला माझ्यापाशीं कांहीं काम नाहीं. जें सांगावें तें हा एका निमिषार्धांत करितो." समंध ह्मणाला "आतां मला कांहीं तरी काम दे. नाहीं तर तुला गिळून टाकीन." मनुष्याला तर त्यास सांगण्याला काम असें कांहींच सुचेनासें झालें. त्यामुळें त्याची अगदीं बोबडी वळली. तो अगदीं धांवत सुटला आणि मोठ्या प्रयासानें त्या महंतास गांठून त्यास ह्मणाला "अहो साधूजी! मला जीवदान द्या." महंतानें काय आहे? ह्मणून विचारलें. तेव्हां तो ह्मणाला. "आतां माझ्या जवळ समंधास देण्याला कांहीं काम नाहीं. मी जें जें कांहीं सांगतों, तें तें तो एका क्षणांत करून टाकतो. आणि आतां मी जर कांहीं न सांगेन, तर तो मला खावयाला तयार झाला आहे." इतक्यांत समंधही पाठोपाठ आला आणि "आतां मी तुला खाणार" असें ह्मणून तो त्यास अगदीं तोंडांत टाकावयाच्या बेतांत आला. तेव्हां तो मनुष्य थरथर कांपूं लागला आणि

आपणास वांचविण्याविषयीं त्या महंताच्या विनवण्या करूं लागला, तेव्हां तो महंत ह्मणाला "ह्यांतून सुटण्याची मी तुला एक युक्ति सांगतों. तें पहा! तेथें एक शेंपूट वांकडे असलेलें कुत्रें आहे. तूं एक तरवार घे आणि तें त्याचें शेंपूट तेवढें तोडून आण. आणि तें त्या समंधाला सरळ करून देण्यास सांग." त्याप्रमाणें मनुष्यानें तें शेंपूट तोडून आणलें. आणि समंधास ह्मणाला "हं! हें एवढें शेंपूट सरळ करून दे." समंधानें तें घेतलें, आणि मोठ्या बेताबेतानें तें हळूच सरळ केलें. पण त्यावरचा हात निघतो न निघतो, तों तें पुन्हां वांकडेच्या वांकडें झालें. त्यानें मोठ्या प्रयत्नानें पुन्हा सरळ केलें, पण त्याचा तो हात निघेपर्यंत अवकाश. तो निघाला कीं पुन्हा पहिल्याप्रमाणें वांकडें तें वांकडेंच! अशी त्यानें कितीएक दिवस खटपट केली. पण तें कुत्र्याचें शेंपूट सरळ ह्मणून कांहीं होईना. अखेर तो समंध थकला आणि ह्मणाला "हाय हाय! इतकी खटपट व त्रास मीं साऱ्या जन्मांत कांहीं

काढला नव्हता. मी प्रत्यक्ष ब्रह्मसमंध असून पुष्कळ वहिवाटलेला खरा. पण मीं साऱ्या जन्मांत असे कष्ट काढले नाहींत. मी तुझ्या बरोबर सलोखा करण्यास तयार आहें. मला कसेंही करून सोडून दे. मीं पूर्वीं जें जें काय तुला दिलें आहे, तें तुला वहाल करितों, व पुन्हा कधीं तुझ्या वाटेस जाणार नाहीं." हें ऐकून त्या मनुष्याला फार आनंद झाला आणि त्यानें त्याचें ह्मणणें मोठ्या संतोषानें मान्य केलें.

जग हें कुत्र्याच्या वांकड्या शेंपटाप्रमाणें आहे. आणि तें सरळ करण्याविषयीं शेंकडों वर्षांपासून जो तो आपआपल्यापरी खटपट करीत आहे. पण त्याच्या हातांतून तें सुटलें पुरे कीं, पूर्ववत् त्याचा आंकडा वळलाच! नाहींतर त्याचें काय व्हावें? कोणालाही प्रथमतः लिप्त न होतां कर्म कसें करावें हें समजून घेतलें पाहिजे. ह्मणजे तो धर्मवेडा होत नाहीं. जग हें कुत्र्याच्या शेंपटाप्रमाणें वांकडें आहे. तें कधींही आपल्या मनाप्रमाणें सरळ होत नाहीं. हें कळलें ह्मणजे

मग आपण धर्मवेडे होत नाहीं. दारूचें वेड, विड्यांचें वेड; अशीं जगामध्यें अनेक प्रकारचीं वेडें आहेत. अशाच वर्गांतील एक तरुण स्त्री होती. चिकागोमध्यें स्त्रियांनीं बांधलेलें एक घर आहे. त्यांत कांहीं धंदेवाले पुरुष जमतात आणि तेथील स्त्रिया त्यांस गायनाची वगैरे तालीम् देत असतात. ह्या स्त्रियांपैकींच ती एक स्त्री होती. एक दिवशीं ही तरुण स्त्री दारू पिणें, चिरूट ओढणें वगैरे व्यसनाच्या संबंधानें माझ्यापाशीं बोलत असतां, ती ह्मणाली "ह्या सर्वांवर मला एक रामबाण उपाय ठाऊक आहे." मीं तिला विचारिलें "असा कोणता उपाय?" ती ह्मणाली "तुह्मांला हॉल हौस माहीत नाहीं काय?" तिच्या मतें हें हॉल हाऊस ह्मणजे एक मनुष्यांच्या हाडीं खिळलेल्या दुर्व्यसनास केवळ त्रैलोक्यचिंतामणीची मात्राच! असले धर्मवेडे लोक हिंदुस्थानांतही आहेत. त्यांना असें वाटतें कीं एकएका स्त्रीला दोन दोन तीन तीन पति करण्याची मोकळीक दिली कीं सर्व दुराचार बंद पडतील. हा सारा धर्मभोळेपणा आहे. शहाणीं मनुष्यें आहेत तीं असें वेडेपण

करीत नाहींत. त्यांना खरें कर्म करतां येतच नाहीं. ह्या जगामध्यें जर धर्मवेड नसतें, तर तें हल्लीं आहे, त्यापेक्षां पुष्कळ पटीनें अधिक सुधारलें असतें. धर्म-वेड हें मनुष्यजातीची उन्नति करतें असें समजणें हा निवळ दुराग्रह व मूर्खपणा आहे. इतकेंच नव्हे तर तो मनुष्यास हलका करणारा एक ओंडका आहे. कारण, तो राग व द्वेष यांना वर आणतो, लोकांना एकमेकासीं झगडावयाला लावतो, आणि त्यांना पाषाणहृदयी बनवून सोडतो. आह्मी जें जें काय करितों व जें जें काय मिळवितों, तेंच काय तें जगामध्यें उत्कृष्ट असें आपणांस वाटतें. आणि जें जें आह्मी करीत नाहीं किंवा जें जें आह्मी मिळवीत नाहीं, त्याला कांहीं किंमतच नाहीं असें आह्मांस वाटतें. ह्याकरितां जेव्हां जेव्हां तुह्मांला धर्मवेडांत शिरण्याची पाळी येईल, तेव्हां तेव्हां ह्या कुत्र्याच्या वांकड्या शेंपटाची आठवण करा. जगाकरितां आपल्याला झिजण्याचें, किंवा जागत बसण्याचें मुळींच कारण नाहीं. आमच्या-शिवाय तें खुशाल चालेल. सर्व सत्ताधीश प्रभू त्याचा

नियंता व सूत्रधार आहे. त्याच्या कृपेखालीं तें दारूची, चिरूटाची, लग्नाची, साऱ्या वासनांची व वेडाची पर्वा न बाळगतां सुखेनैव चालेल. तुह्मी जर सारीं धर्मवेडें सोडून द्याल, तर तुह्मी स्वतः चांगलें काम करूं लागाल. जो सत्कृत्य करितो तोच सरळ डोक्याचा मनुष्य; तोच शांत मनुष्य; सद्विचारी आणि थंड ज्ञानतंतूचा मनुष्य तोच; अत्यंत दयाळू व भक्तिमान् मनुष्य तोच; आणि तोच आपला कल्याणकर्ता होय. धर्मभोळेपणा हा निखालस मूर्खपणा आहे आणि त्यांत सदयता नाहीं. त्याला जगास सरळ करितां येत नाहीं, व तो निर्मळ आणि पूर्ण होत नाहीं.

आपल्या अमेरिकन इतिहासांतील "मेफ्लावर" जाहाजावरच्या लोकांची, आणि ते येथें प्युरिटान लोकांप्रमाणें कसे आले ह्याची आपणास आठवण नाहीं काय? प्रारंभीं ते अगदीं पवित्र आणि सुजन होते, पण लौकरच दुसऱ्या लोकांस गांजूं लागले. कोठचाही इतिहास पहा, मनुष्यस्वभावाचा प्रकार ह्राच. छळ दुःसह होऊन जे लोक पळ

काढतात तेच लोक हवी तशी अनुकूल संधी सांपडली कीं लगेच त्या लोकांवर उलटून पडून छळास सुरवात करितात. मीं दोन अद्भुत गलबतांविषयीं वाचलेलें आहे. पहिलें नोवाचें गलबत आणि दुसरें "मेफ्लावर." ज्यूलोक ह्मणतात कीं, सर्व उत्पत्ति नोवाच्या गलबतापासून झाली. अमेरिकन लोक ह्मणतात कीं, जवळ जवळ अर्धें जग "मेफ्लावर"पासून उत्पन्न झालें आहे. असें न ह्मणणारा गृहस्थ मला येथें क्वचित् आढळला असेल. 'माझा आजा किंवा पणजा "मेफ्लावर"-मधून आला होता' " हें एक तऱ्हेचें धर्मवेडच. धर्मवेड्यांपैकीं शेंकडा नव्वदांना तरी काळजाचा रोग असावा, अथवा त्यांना अग्निमांद्य असावें, किंवा निदान कांहीं तरी रोग असला पाहिजे. वैद्यांना सुद्धां हळू हळू " धर्मवेड " हा एक प्रकारचा रोग आहे असें समजून येईल, असे शेंकडों लोक मीं पाहिले आहेत. ईश्वर करो आणि मला तरी तो त्यांच्यांत न पाडो.'

ह्या बाबतीमध्यें माझा तर दृढनिश्चय झालेला आहे. तो हा कीं, आपण कोणत्याही धर्मवेडाच्या

सुधारणेच्या संबंधापासून अलग राहावयाचें. जे विचारे मद्यपी बनतात, त्यांच्यावर दारूबाजाची तरी प्रीति असते असें आपण ह्मणाल काय? व्यसनी ते व्यसनीच होत. कारण ते व्यसनापासूनच आपणास कांहीं तरी मिळावें ह्मणून अपेक्षा धरून बसतात. लढाई संपली न संपली तोंच लुटीकरतां आंत घुसतात. व्यसनी लोकांच्या पिठ्यांतून आपण जाऊन आलांत, कीं ते एकमेकांवर किती प्रीति करितात, व त्यांस दुसऱ्याचा खरोखर किती कळवळा येतो हें तुह्मांस तात्काळ कळून येईल. नंतर त्यांना अधोगतीस पोंचविणाऱ्या अनेक गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न कराल, तर तुह्मांस असें वाटेल, कीं, आपण जर त्याच्या जागीं असतों, तर कदाचित् आत्महत्त्या सुद्धां करून घेतली असती! मला एक बाई आठवते, हिचा नवरा अट्टल दारूबाज होता, व त्याच्याबद्दल ती माझ्यापाशीं पुष्कळ नालस्ती करीत बसली होती. मीं तिला निक्षून सांगितलें कीं, दारूबाजांपैकीं पुष्कळ लोकांस तें व्यसन लावून देण्यास त्यांच्या बायकाच

कारणीभूत होतात. मी नेहमीं खरें असेल तेंच बोलतों, तोंडदेखणें मला बोलतां येत नाहीं. सोसणें, 'धीर धरणें' हे शब्दच ज्या बायकांच्या मनांतून गेलेले असतात, आणि ज्यांच्या मनांतील स्वतःसिद्ध होण्याच्या खुळसट कल्पना पुरुषांनीं आपल्या चरणीं लागावें असें ह्मणत असतात. आणि त्यांना जी आवडत नाहीं, अशी एखादी गोष्ट तोंडांतून निघाली कीं त्या रडूं लागतात,—आकाशपाताळ एक करितात,—त्या बायका जगाचें केवळ विष होत. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, जगांतील अर्ध्या पुरुषांनाही त्या आत्महत्येला प्रवृत्त होऊं देत नाहींत. अशा बायकांचे कैवार घेणारे जे कोणी गुरु असतात, व जे त्यांना "बायांनो! तुह्मी पृथ्वीच्या पाठीवर एक अद्भुत प्राणी निर्माण झाला आहां" असें ह्मणतात, त्यांच्याकडून त्या अर्धी उपासमार करून "घेतात. अशांपैकीं बहुतेक बायका असल्या गुरूंना खुशाल ह्मणतात कीं "हेच आमचे गुरु आहेत." आणि त्यांनाच त्या द्रव्य वगैरे सर्व कांहीं अर्पण करितात. अशाच तऱ्हेनें

ह्या गोष्टी चालत असतात. जन्म हा कांहीं अशा प्रकारची थट्टा नव्हे. त्यांत ह्यापेक्षां थोडा तरी भारदस्तपणा आहे.

आतां मला आजच्या व्याख्यानांतील मुख्य मुख्य मुद्दे आपणास ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत ते सांगूं द्या. जग आमचें कांहींएक लागत नाहीं. जगाकरितां कोणतीही गोष्ट करण्याला आपणां सर्वांस श्रेष्ठ हक्क आहे. जगाला मदत करणें ह्मणजे आपल्या स्वतःलाच मदत करणें होय. दुसरी ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, ह्या ब्रह्मांडामध्यें परमेश्वर आहेच. तुमची किंवा माझी मदत पाहिजे ह्मणून जग खोळंबून बसलें आहे, ही गोष्ट खरी नव्हे. परमेश्वर सर्वत्र तत्पर आहे. तो अजरामर, अनाद्यंत सततोद्योगी आणि अखंड जागृत आहे. त्याचा व्यापार सारखा चालू आहे. जगांतील व्यक्त स्वरूपें व ह्मलचाली ह्या सर्व त्याच्या आहेत. तिसरें, आपण कोणाचाही द्वेष करूं नये. जग हें नेहेमीं चांगल्याच्या आणि वाइटाच्या मिश्रणानें चाललेलें

आहे. दीनाविषयीं कळकळ बाळगणें, दुष्कृत्यें करणारावरही प्रीति करणें, हें आपलें कर्तव्य आहे. जग ही नीतिमत्तेनें स्थापन केलेली तालिम आहे. तिच्यामध्यें आपण सर्वांनीं तालमीचा अभ्यास करून अध्यात्म सामर्थ्यानें अधिक अधिक पुष्ट व्हावें. चवथें, आह्मीं कोणत्याही प्रकारें देवभोळे होऊं नये. कारण, धर्मवेड हें प्रेमाच्या विरुद्ध असतें. धर्मवेड्यांची नेहमींची ह्मण आपण ऐकतोंच कीं "मी पातक्यांचा द्वेष करीत नाहीं, पण पापाचा द्वेष करतों." परंतु पातक आणि पातकी ह्यांचा खराखुरा भेद जो कोणी दाखवून देणारा मनुष्य असेल, त्याची सुरत पाहावयाला मला पाहिजे तितकें दूर जावें लागलें तरी मी जाण्यास तयार आहें. तें ह्मणावयाचें फार सोपें आहे. पदार्थांतला आणि त्याच्या गुणांतला भेद जर आह्मांस समजूं लागला, तर आह्मी पूर्णत्वासच पोंचलों असें ह्मटलें पाहिजे. पण तें करणें सोपें नाहीं. उत्तरोत्तर आह्मी जर शांत झालों, आमचे ज्ञानतंतूंची खळबळ जर कमी पडली, तर आह्मीं

अधिक प्रेमळ होऊं व आमचें कर्मही पहिल्याहून चांगलें होईल.

# भाग सहावा.

## मीपणाचा निखालस विसर पडणें ह्याचेंच नांव अलिप्तपणा.

आपल्यापासून निघालेलें कर्म, ज्याप्रमाणें प्रतिक्रिया घडून परत आपल्याकडेच येतें, त्याचप्रमाणें आमच्या कर्माचा परिणाम दुसऱ्यावर घडतो, व दुसऱ्याच्या कर्माचा परिणाम आपल्यावरही घडत असतो. कदाचित् आपणा सर्वांच्या प्रत्ययाला सुद्धां ही गोष्ट आलेली असेल कीं, मनुष्यें एकदां दुष्कर्मै करूं लागलीं ह्मणजे तीं उत्तरोत्तर अधिकाधिकच करूं लागतात; आणि तीं जेव्हां सत्कर्मै करायाला प्रारंभ करतात, तेव्हां तीं सारा वेळ सत्कर्मैंच करीत सुटतात; व दिवसेंदिवस सामर्थ्यवान् होत जातात. कर्माच्या ह्या

गुणाच्या परिणामाची उपपत्ति “ आपण परस्परांवर कांहीं तरी कार्य करितों ” ह्याशिवाय दुसरी कोणतीच सांगतां यावयाची नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्राप्रमाणें पाहिलें तरी, आपण जेव्हां एखादें काम करीत असतों, त्या वेळीं आपल्या मनोलहरीचेंही तसेंच कार्य चाललेलें असतें असें ह्मणतात. आणि त्याच स्थितीमध्यें जीं जीं मनें असतील त्यांच्या त्यांच्यावर माझ्या मनाचा संस्कार घडण्याचा गुण असतो. एखाद्या खोलीमध्यें एकाच स्वराचीं निरनिराळीं वाद्यें आणून ठेविलीं आणि त्यांतील एक जर वाजूं लागलें, तर सर्वांतून तोच स्वर घुमत असल्याचें आपणांस दिसून येईल. त्याचप्रमाणें ह्या मनाच्या स्थितींतही एकजातीचा धक्का बसून एकच धर्म खेळत असल्याचें दिसून येईल. ज्या ज्या मनामध्यें एकच धर्म भरलेला असतो, तीं तीं सारीं मनें एकाच विचारानें विकृत होतात. अर्थात् ही विचारशक्ति, अंतराच्या प्रमाणानें आणि इतर कांहीं कारणाप्रमाणें मनावर आपला कमजास्त अंमल चालविते. आणि त्याचा तो गुण घेण्याला मन अगदीं

"आ" करून बसलेलें असतें. कल्पना करा कीं, मी एखादें दुष्कृत्य करीत आहें; माझें मन एका विविक्षित स्थितीमध्यें आहे; तर ब्रह्मांडांतील जितकीं जितकीं मनें त्याच स्थितीमध्यें असतील, तितकीं तितकीं माझ्या मनोविकारानें विकृत होतील. तसेंच मी जेव्हां सत्कृत्य करीन, तेव्हां माझें मन दुसऱ्या प्रकारच्या लहरींमध्यें असेल. आणि त्या स्थितींत जितकीं मनें असतील, तितकीं सारीं मनें माझ्या मनोविकारानें विकृत होऊं शकतील. आणि ह्या गुणांचा जोर ज्या मानानें अधिक किंवा उणा असेल, त्या मानानें ही मनाची शक्ति, इतर मनांवरही अधिक किंवा उणा अंमल चालवील.

ही गोष्ट नीटपणें ध्यानांत येण्याला खालचा दृष्टांत फारच समर्पक आहे. प्रकाशकिरण ज्याप्रमाणें कोणत्याही पदार्थाला पोंचण्यापूर्वी लक्षावधि वर्षें प्रवास करीत असतात, त्याचप्रमाणें विचारलहरीही, आपल्या स्थितीशीं तुल्य असा पदार्थ मिळेपर्यंत शेंकडों वर्षें प्रवास करीत असल्या पाहिजेत. ह्यावरून ही गोष्ट अ-

गर्दी शक्य आहे कीं, आमचें वातावरण चांगल्या व वाईट अशा दोन्ही धक्क्यांनीं भरलेलें असलें पाहिजे. प्रत्येक मेंदूंतून निघालेला विचार, धक्के देत जात असल्या-प्रमाणें जात असतो, आणि त्याला योग्य पदार्थ मि-ळतांच त्याचा तो स्वीकार करतो. अशा प्रकारचे धक्के घेण्यास तयार असलेलें कोणतेंही मन तेव्हांच त्याचा स्वीकार करतें. ह्मणून मनुष्य जेव्हां दुष्कर्में करितो, तेव्हां तो एका विविक्षित विकारोत्पन्न स्थितींत आ-पलें मन आणतो. आणि त्या स्थितीला सरूप अस-णाऱ्या सर्व लहरी, आणि वातावरणांत भरून तरंगत असणाऱ्या लहरी, ह्या सर्व त्याच्या मनांत घु-सण्याची सुरवात करतात. ह्याच कारणानें दुराचारी मनुष्य बहुतकरून अधिकाधिकच दुराचरण करींत सुटतो. त्यांचीं कर्में वाढतच जातात. सत्कर्म कर-णाराची गोष्टही अशीच होतें. तोही वातावर-णांतील लहरी ग्रहण करण्यासाठीं तयार होऊन बस-लेला असतो. ह्यामुळें त्याचीं सत्कृत्येंही वाढतच जातात. ह्मणून आह्मी दुराचरण करतांना द्विगुणित

अनर्थामध्यें पडतों. एक तर आह्मी आपला दुष्प्रवाह आपल्या सभोंवार पेरून सोडतों, आणि दुसरें आमच्या दुराचाराचा परिणाम दुसऱ्यास भोंवावयास लावतों. ह्यावरून आमचीं दुष्कृत्यें शेंकडों वर्षांपासून दुसऱ्यास भोंवत राहणें शक्य आहे. दुष्कृत्य करण्यामध्यें आह्मीं आपल्या स्वतःला आणि दुसऱ्यालाही दुःखांत पाडतों. त्याचप्रमाणें सत्कृत्य करण्यामध्यें आह्मी आपलेंही कल्याण करतों, आणि दुसऱ्याचेंही पण कल्याण करितों. आणि मनुष्यांतील दुसऱ्या इतर शक्तीप्रमाणें सच्छक्ति आणि असच्छक्ति ह्याही बाहेरच्या शक्ति आपणामध्यें घेऊन वाढत असतात.

कर्मयोगाप्रमाणें, कोणत्याही मनुष्यानें केलेलें कर्म, त्याचें फल उत्पन्न होईपर्यंत नाश पावत नाहीं. त्याच्या फलप्राप्तीला सृष्टीकडून सुद्धां प्रतिबंध करवत नाहीं. मीं जर दुष्कर्म केलें तर, त्याचें दुःख मला भोगलें पाहिजे. त्यांतून सोडविण्याला किंवा तें थांबवून धरण्याला ब्रह्मांडामध्यें सुद्धां शक्ति नाहीं.

तसेंच मीं सत्कृत्य केलें तर, त्याचें सत्फल मिळण्यांत प्रतिबंध करण्याचेंही ब्रह्मांडांत सामर्थ्य नाहीं. कारणाला, त्याचा धर्म हा असलाच पाहिजे. तो चुकविण्याला किंवा टाळण्याला कोणीच समर्थ नाहीं. आतां कर्म-योगाच्या संबंधानें आणखी एक फारच सुंदर आणि भारदस्त विषय विचार करण्यासारखा आहे. तो हा कीं, हीं आमचीं सत्कर्मे व दुष्कर्मे एकमेकांशीं अगदीं चिकटून राहिलेलीं असतात. हें कर्म पूर्णपणें चांगलेंच आहे किंवा हें कर्म पूर्णपणें वाईटच आहे, असें आह्मांस खात्रीनं एका शब्दानें सुद्धां ह्मणतां येणार नाहीं, किंवा एक ओळ लिहितां येणार नाहीं. एकसमयावच्छेदेंकरून चांगलीं व वाईट फळें उत्पन्न करीत नाहीं, असें एकही कर्म नाहीं. अगदीं जवळचेंच उदाहरण पाहिजे असेल तर, मी आपणाबरोबर बोलतों आहें. ह्याला आपणांपैकीं कांहीं लोक कदाचित् मी चांगलें करीत आहें असें ह्मणत असतील. पण हें करतांना मी कदाचित् हवेंतील अति सूक्ष्म जीव ठार मारीत असेन. किंवा असेंच दुसरेंही कांहीं वाईट कृत्य करीत असेन.

मनुष्यांचें असें कोणतेंही कृत्य नाहीं, कीं जें पूर्णपणें वाईट किंवा पूर्णपणें चांगलें असेल. कर्म, आमच्या अगदीं निकट सान्निध्याला असलें; आणि त्याचा परिणाम आमच्या परिचित मनुष्यावर होत असला, ह्मणजे तें कर्म फार चांगलें आहे असें आह्मी ह्मणतों. आणि त्यांच्यावर त्याचा परिणामही फार चांगल्या तऱ्हेचा होतो. उदाहरण, आपण आपल्या संबंधानें माझें बोलणें चांगलें आहे असें ह्मणाल, पण सूक्ष्म जीव तसें ह्मणणार नाहींत. आपण फक्त आपल्याकडे पाहतां, सूक्ष्म जीवांकडे पहात नाहीं. माझ्या भाषणाचा परिणाम ज्या मार्गावर घडतो, तो मार्ग आपणास खुला होतो. पण सूक्ष्म जीवांना तो कांहीं इतका उघडा होत नाहीं ह्मणून आमच्या दुष्कर्माविषयीं आह्मी विचार करूं लागलों तर असें दिसतें कीं त्यापासून कांहीं तरी चांगला परिणाम होणें शक्य आहे. सत्कृत्यामध्यें पाहूं गेलें तर, त्यांतही कांहींना कांहीं तरी वाईट दृष्टीस पडतें व दुष्कर्मामध्यें पाहूं

लागलें तर त्यांतही कांहींना कांहीं चांगलें काम दृष्टीस पडतें, हेंच कर्मांतील हृद्य होय.

पण ह्यावरून काय निघतें? तर ह्यांतील सारांश हा, कीं निरुपद्रविक ह्मणजे पवित्र; व उपद्रविक ह्मणजे मलीन; असा अर्थ धरून विचार केला तर, निखालस पवित्र व निखालस मलीन असें कोणतेंच कर्म असत नाहीं. दुसऱ्याला उपद्रव दिल्यावांचून आह्मांला जगतां येणार नाहीं, कीं श्वासोच्छ्वास घेतां येणार नाहीं. आह्मी अन्नाचा प्रत्येक घास घेतों तो दुसऱ्याच्या तोंडांतला काढून घेत असतों. दुसरे अनेक जीव घेऊन आमचा एक जीव आह्मी जगवीत असतों. भगवद्गीतेमध्येंही असेंच सांगितलें आहे. मनुष्यें ह्मणा—जनावरें ह्मणा—किंवा अतिसूक्ष्म जीवजंतु ह्मणा—ह्यांच्यापैकीं—हा—नाहीं तो—पण त्यांच्यावर धाड ही घातलीच पाहिजे. असा प्रकार असल्यामुळें स्वभावगत्याच निखालस निरुपद्रवी कर्म असें कोणतेंच होणें शक्य नाहीं. आपणास अखंड कर्म करतां येईल, पण ह्या घोंटाळ्यांतून बाहेर पडण्याला मात्र मार्ग नाहीं.

तुह्मी कर्म कर कर करा; पण कर्माच्या फलांतील चांगले वाईटपणा नाहींसा होणें मात्र अपरिहार्य आहे.

तेव्हां दुसरा विचार करण्याचा मुद्दा हा आहे कीं, कर्माचा शेवट तरी कोणता? प्रत्येक देशांतील पुष्कळ लोकांचा असा भरंवसा असल्याचें आपणांस दिसून येतें कीं, पुढें असा एक काल येईल कीं, त्या वेळीं हें सारें जग पूर्णावस्थेला पोंचेल. तेव्हां रोग नाहीं; मृत्यु नाहीं; दुःख नाहीं; किंवा दुष्टपणाही नाहीं. अज्ञान्यांना घोड्यावर घालून त्यांच्या अंगांत वारें भरविण्याला ही कल्पना फार छान आहे. परंतु आपण एक क्षणभर जर विचार केला, तर सकृद्दर्शनींच आपल्या लक्षांत येईल कीं, असें होणेंच मुळीं शक्य नाहीं. चांगलें आणि वाईट हें एकाच नाण्याचे उलट सुलट गुण असलेले जर कळतात, तर ही गोष्ट होणार कशी? वाइटाला कंटाळून त्याच वेळीं त्याचें आपण चांगलें करणार कसें? पूर्णता ह्मणजे तरी काय? परिपूर्ण आयुष्य ह्मणजे बहुतेक त्याच्या नित्यधर्माच्या उलट होय. आपल्या स्वतःमध्यें आणि

बाह्य जगांतील प्रत्येक वस्तूमध्यें अखंड चाललेला जो-झगडा, ह्याचें नांव आयुष्य किंवा जन्म. आपण खरोखर प्रतिक्षणीं बाह्य जगाबरोबर झगडत असतों, आणि त्यांत आमचा पराभव झाला कीं आमचें आयुष्य संपलेंच. उदाहरणार्थ हवा आणि अन्न. ह्यांच्याकरितां आमचा सारखा झगडा सुरू आहे. हवा आणि अन्न मिळालें नाहीं, कीं आह्मी मरणार. आयुष्य ही यःकश्चित् हलकी व तरंगणारी वस्तु नव्हे, तर तें गुणांचें मिश्रण आहे. आंतील एक तत्व आणि बाह्य जग ह्यांच्यांतील जो झगडा त्याचें नांव आयुष्य. ह्यावरून हा झगडा संपला कीं, आयुष्याचीही समाप्ति झालीच ह्मणून समजावें, हें अगदीं उघड आहे.

परिपूर्ण सुखाची किंवा दिव्य सुखाची जी कल्पना आहे, ती ग्रहण केली ह्मणजे हा झगडा बंद झाला. झगडा बंद झाला ह्मणजे आयुष्य संपलें. आणि आयुष्यच मुळीं नाहींसें झालें तर झगडाही नाहींसा होऊं शकेल. तसेंच आह्मांला ह्या काल्पनिक सुखाचा एक सहस्रांश

लाभण्यापूर्वींच ही पृथ्वी थंडगार पडेल. आणि आह्मी कोरेच्याकोरे राहूं! ह्मणून हा चमत्कार दुसरा कोठें असला तरी, ह्या जगांत होणें शक्य नाहीं. जगाला मदत करणें, ह्मणजे आपली आपल्यासच मदत करणें हें आपणांस पूर्वीं समजलेंच आहे. दुसऱ्यासाठीं काम करण्यांत आपणास पवित्र करणें' हा प्रधान हेतु असतो. निरंतर दुसऱ्यासाठींच कर्म करीत राहणें, ह्मणजे स्वतःला विसरण्याचीच खटपट करणें, होय. आणि हा स्वतःचा विसराळूपणा हेंच कायतें ह्या जन्मांत शिकण्याचा मोठा धडा आहे. आपणच आपल्याला सुखी करूं असें जें मनुष्याला वाटतें, तो मूर्खपणा वरींच वर्षें झगड्यांत लोटल्यानंतर अखेर त्यास समजून चुकतें कीं, स्वार्थत्यागाला निजधामास पाठविण्यांतच कायतें खरें सुख आहे. त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेंच त्याला सुखी करवत नाहीं. धर्माचें प्रत्येक कर्म; दयेचा प्रत्येक विचार; परोपकाराचें प्रत्येक कार्य; आणि हरएक सत्कृत्य हीं सारीं आमच्या लहान लहानशा

" मीपणांतून " इतका मीपणा काढून घेतात कीं, शेवटीं आह्मांला आमच्या मीपणाची आठवण फारच थोडी राहते. ह्मणूनच तें सर्व चांगलें. ज्ञान, भक्ति आणि कर्म हीं सारीं एकच ठिकाणीं पोंचत असल्याचें आपणांस दिसून येतें, "मी" हें सर्व नाहींसें होऊन जातें, त्या वेळीं "तूं"च काय तें शिलक रहातें. परिपूर्ण रीतीनें आणि शाश्वत मीपणाचा विसर पडणें, हेंच कायतें खरें तत्व किंवा खरें सौख्य आहे. आणखी, त्याला समजो वा न समजो—पण कर्मयोग मनुष्याला त्याच स्थितीला पोंचवितो. एखाद्या धर्माध्यक्षाला अकर्तृत्व ईश्वराची कल्पना भयंकर वाटत असेल; ईश्वर हा कर्तृत्ववान् असें त्याचें दृढमत असेल; त्यास तो अगदीं चिकटलेला असेल; आणि तो आपला निराळेपणा व दृढनिश्चय संरक्षण करण्याची इच्छाही धरूं शकेल. पण त्याच्या नीतीच्या कल्पना खरोखर जरी चांगल्या असल्या तरी—निखालस मीपणाच्या विस्मरणाच्या पायावर येऊं शकत नाहींत. आणि तो तर साऱ्या नीतितत्वाचा पाया आहे. तो आपणाला मनुष्यापर्यंत, जनावरा-

पर्यंत व गंधर्वापर्यंतही वाढवितां येईल. नैतिक पद्धति ह्मणून जितक्या आहेत, त्यांच्यामध्यें ही एकच मूळकल्पना व हें एकच मूलाधार तत्व खेळत असतें.

ह्या जगामध्यें मनुष्यांचे अनेक वर्ग दिसून येतात. दैविक मनुष्यें–हीं आपल्याला अगदींच विसरलेलीं असतात. आणि तीं आपला प्राण जाईपर्यंत दुसऱ्याचें केवळ चांगलेंच करितात. अशीं मनुष्यें अत्यंत श्रेष्ठ होत. कोणत्याही देशांत असे लोक शंभर असतील तर त्याला कधींच निराश व्हावें लागणार नाहीं. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, असे लोक फारच थोडे असतात. त्यानंतर दुसरे कांहीं चांगले लोक असतात. ते आपल्याला जेथपर्यंत चट्टा बसत नाहीं, तेथपर्यंत दुसऱ्याचें बरें करितात. आणखी तिसरा एक वर्ग आहे तो दुसऱ्याला दुःख देऊन आपलें चांगलें करितो. आमच्या संस्कृत कवींनीं आणखी एक चौथ्या लोकांचा वर्ग केला आहे. ह्यांतील लोक दुसऱ्याला केवळ–विनाकारण–दुःख देतात. अशा प्रकारें जे कोणी चांगलें

करावयाचें ह्मणूनच चांगलें करितात, ते अत्यंत श्रेष्ठ मनुष्य. हे एका टोंकाला असतात; आणि दुसऱ्या टोंकाला जे केवळ दुःख द्यावें ह्मणूनच दुःख देणार, ते असतात. त्यांना त्यापासून कांहीं एक फायदा नसतो तरी, दुसऱ्याचें वाईट करावें असा त्यांचा स्वभावच असतो. ह्यावरून आमच्या कवीनें ह्मटल्याप्रमाणें, जो मनुष्य दुसऱ्याचें वरें करण्यासाठीं आपला देह खर्ची घालतो, तो सर्वांत श्रेष्ठ व स्वतःला निखालस विसरणारा होय. आणि तोच खरोखर सर्वोत्तम पुरुष.

संस्कृतामध्यें दोन शब्द आहेत. एक "प्रवृत्ति". ह्याचा अर्थ आपल्याकडे ओढणें. आणि दुसरी "निवृत्ति". ह्याचा अर्थ बाहेर टाकणें. आपल्याकडे ओढणें, ह्यालाच आह्मी जग, "मी" व "माझें" असें ह्मणतों. संपत्तीनें, वैभवानें, सत्तेनें, नांवलौकिकानें आणि कीर्तीनें, स्वतःला—अहंकाराला—संपन्न करणाऱ्या, प्रकृतीस बद्ध करून "माझें" ह्या बिंदूकडे हरएकास वळवून आणणाऱ्या ज्या ज्या गोष्टी आहेत, त्या सर्वांचा ह्यांत समावेश होतो. ह्मणजे

"प्रवृत्ति" हा गुण, प्रत्येक मनुष्यप्राण्यामध्यें स्वभावसिद्धच असतो. प्रत्येकांतील कांहींना कांहीं तरी घेऊन तें एकाच ठिकाणीं आणून तो बिंदु फुगवितो. हा बिंदु ह्मणजे मनुष्याचा स्वतःचा जो आवडता अहंकार तो. हा धर्म जेव्हां मोडावयास प्रयत्न होतो तेव्हांच निवृत्ति—ह्मणजे स्वार्थत्याग—प्राप्त होतो. आणि स्वार्थत्याग प्राप्त झाला कीं, धर्म आणि नीति यांचा उदय होतो. प्रवृत्ति आणि निवृत्ति, ह्या दोनीही कर्मप्रकृतिजन्य आहेत. पहिली असत्कर्मरूप आहे; आणि दुसरी सत्कर्मरूप आहे. निवृत्ति ही, सारे धर्म व सारीं नीतिशास्त्रें यांचा मूळपाया, निरहंकारतेची परिपूर्णता, व इतर प्राण्यांसाठीं कायावाचा व मन अर्पण करण्याची सिद्धता होय. कोणताही मनुष्य जेव्हां ह्या स्थितीला पोंचतो, तेव्हां त्याला कर्मयोगाची सिद्धि प्राप्त होते. सत्कर्माचें सर्वांत श्रेष्ठ फल तें हेंच. एखाद्या मनुष्यानें शास्त्राचा एकही अंश जरी पाहिला नसला; कोणत्याही देवावर त्याचा जरी विश्वास नसला; त्यानें भक्ति जरी कधीं केली नसली;

साऱ्या जन्मांत, एक वेळही परमेश्वराची प्रार्थना केली नसली तरी सत्कर्माचें अल्प सामर्थ्यही, दुसऱ्याकरितां जीव, किंवा दुसरें कोणतेंही, खर्ची घालवयास सिद्ध होण्याच्या स्थितीला त्यास पोंचवितें. धार्मिक मनुष्य आपल्या उपासनेनें, शास्त्रानें, व ज्ञानानें ज्या ठिकाणीं पोंचतो, त्याच ठिकाणीं तोही पोंचतो. ह्यावरून आपणास समजून येईल कीं, तत्ववेत्ता, कर्मनिष्ठ आणि भक्त हे सारे एकाच ठिकाणीं पोंचतात. आणि तें ठिकाण ह्मणजे "निरहंकारता" हें होय. त्यांच्या पुष्कळ धर्मपद्धती व शास्त्रपद्धती भिन्न भिन्न असल्या तरी सुद्धां, इतरांकरितां जो मनुष्य सर्वस्व खर्ची घालण्यास तयार असतो, त्याच्याबद्दल सर्व मनुष्यजात पूज्यबुद्धि व धाक बाळगते. तेथें पंथ, मताभिमान ह्यांविषयीं तर मुळीं प्रश्नच नाहीं, पण जीं मनुष्यें कोणत्याही धर्मकल्पनेच्या विरुद्ध असतात, त्यांनीं ह्या निखालस निस्पृहपणाच्या कृत्यांतील एखादें कृत्य जरी पाहिलें, तरी त्यांस सुद्धां वाटतें

कीं, त्याच्यावर पूज्यबुद्धि ठेवावी. "एशियांतील प्रकाश" म्हणून एडविन् अर्नोल्ड यानें जें पुस्तक केलेलें आहे, तें वाचून अतिशयित धर्मनिष्ठ असे ख्रिस्तीधर्माचे लोक, "ईश्वर मुळींच नाहीं; परोपकारा-शिवाय दुसरें पुण्य असें कांहीं नाहीं" असें प्रतिपादन करणाऱ्या बुद्धाला सुद्धां पूज्य मानित असलेले आपण पाहिले नाहींत काय? गोम म्हणून इतकीच कीं, धर्म-निष्ठ लोकांना, आपल्या आयुष्यांतील रोख व पल्ल्या-प्रमाणेंच, आपल्याहून भिन्न असणाऱ्यांच्या आयु-ष्यांतील रोख व पल्ला हुबेहुब असतो, हें समजत नाहीं. भक्त, आपल्यापुढें निरंतर परमेश्वराची कल्पना ठेवून आणि सभोंवार सर्व पुण्य भरून सरते शेवटीं त्याच पदाला पोंचतो. आणि म्हणतो, "सारा कर्ता करविता तूंच आहेस," आपणाकडे कांहीं नाहीं. हीच निरहंकारता. ज्ञानी हा, आपल्या ज्ञानाच्या योगानें, दिखाऊपणा ही सारी फसवणूक आहे असें समजून स्वाभाविकपणेंच तो एकदम टाकून देतो. तीच निरहं-कारता. म्हणून कर्म, भक्ति आणि ज्ञान हीं सारीं

येथें एकत्र मिळतात. प्राचीन काळांतील धर्मोपदेशक "परमेश्वर ह्मणजे कांहीं जग नव्हे." असें जें सांगत आले आहेत, त्यांतील भावार्थ हाच. ह्मणून जग वेगळें आणि परमेश्वर वेगळा, हा भेद अगदीं खरा आहे. जग ह्मणजे स्वार्थीपणा, हाच त्यांनीं धरलेला अर्थ होय. स्वार्थत्यागीपणा हा परमेश्वर. एखादा मनुष्य सुवर्णप्रासादांत राहून, सिंहासनावर बसून पूर्ण स्वार्थत्यागी बनतो, आणि मग तो ईश्वरांत राहतो. दुसरा झोंपडीमध्यें राहतो, चिंध्या पांघरतो, आणि जगामध्यें त्याचें कांहींएक नसतां स्वार्थपरायण असतो. तो जगामध्यें सपशील बुडाला ह्मणून समजावें.

आतां पूर्वींच्या आमच्या मुख्य मुद्यावर येतांना, आह्मी ह्मणतों कीं, आह्मांला चांगलें काम करतांना त्याच वेळीं कांहींतरी वाईट काम केल्याशिवाय, किंवा वाईट काम करतांना त्याच क्षणीं कांहीं चांगलें काम केल्याशिवाय कांहींच करतां येणार नाहीं. हें जर खरें आहे, तर आपणास कर्म तरी कसें करतां येईल?

ह्मणूनच ह्या जगामध्यें अनेक पंथ झालेले आहेत. ते आपल्या उलट्या आणि आश्चर्यजनक पद्धतीनें जगांतून मुक्त कसें व्हावें ह्याकरितां, हळू हळू आत्मघात कसा करावा ह्याचा उपदेश करतात. कारण, मनुष्य जर वांचला तर त्याला लहान लहान गरीव प्राणी किंवा वनस्पती ह्यांचा जीव घ्यावा लागतो. किंवा कोणाला आणि कशाला तरी दुखवावें लागतें. ह्याकरितां त्याच्या मताप्रमाणें जगांतून सुटण्यास रस्ता ह्मणून काय तो मरण हाच होय. जैन लोकांचें सर्वोत्तम मत काय तें हेंच. आणि ह्याचाच ते उपदेश करतात. हें मत तार्किक असावेंसें दिसतें. परंतु ह्याचा खरा रस्ता भगवद्गीतेमध्यें दिसून येतो. आमच्या जन्मांतील कर्में करतांना शून्याला—ब्रह्माला—अर्पण करणें, किंवा फलत्याग करणें, ही अलिप्ततेची उपपत्ति आहे. आपण जगापासून निखालस वेगळे आहों; आपण जगामध्यें असून जें जें काय करतों, तें आपण आपल्याकरितां करीत नाहीं; हें ध्यानांत ठेवावें. आपल्याकरतां जें कर्म तुह्मी कराल, त्याचीं

फळें तुह्मांकडे येतील. चांगलें कर्म असेल तर त्याचें चांगलें फळ आपणांस घेतलें पाहिजे. आणि वाईट कर्म असेल त्याचें वाईट फळ आपणांस भोगलें पाहिजे. पण जें कर्म आपल्याकरतां ह्मणून करीत नाहीं-मग तें कोणतेंही कर्म असो—तर त्याचें फल आपणांकडे येत नाहीं. ही कल्पना मनांत एकदम उभी राहण्यासारखें आमच्या धर्मपुस्तकांत एक अशाच समानार्थाचें वाक्य आहे. तें असें-"मी जें कांहीं करीत आहें तें मजकरितां मुळींच करीत नाहीं असें जो समजतो, त्यानें सर्व जगाचा जीव घेतला; किंवा आत्महत्या केली; तरी तो मरत नाहीं, किंवा त्यानें जगास मारलें असें होत नाहीं." ह्मणून कर्मयोग उपदेश करतो कीं "जगाला सोडूं नका; त्याचा त्याग करूं नका; जगामध्येंच रहा; त्यांतील ग्राह्यामृत पिववेल तितकें पिऊन टाका. पण स्वतःच्या उपभोगासाठीं ह्मणून जर कांहीं कर्म असेल, तर तें मात्र बिलकूल करूं नका. विषयोपभोग हीच काय ती इति-

कर्तव्यता, असें समजूं नका. प्रथम आपला अहंकार ठार करा, आणि मग सर्व जग हेंच आपण, असें माना. वृद्ध ख्रिस्ती मनुष्य ह्मणतात, " ह्मातार्‍या माणसानें मेलेंच पाहिजे." ह्यांत स्वार्थावरच ह्मातार्‍या माणसाची उत्प्रेक्षा केली आहे. सर्व जग आपल्या उपभोगासाठीं केलें आहे असें ह्मणणें, हाच स्वार्थ होय. कांहीं मूर्ख आईबापें आपल्या मुलाला प्रार्थना करावयाला शिकवितात कीं, "हे प्रभो! हे चंद्र व सूर्य तूं मजकारितां निर्माण केले आहेस" जणों काय ह्या पोराला प्रत्येक वस्तु निर्माण करून देण्यावांचून परमेश्वराला दुसरा धंदाच नव्हता! असे ज्ञानलवदुर्विदग्ध विचार आपल्या मुलांस शिकवूं नका. तशीच, दुसर्‍या कितीएक लोकांची मूर्खपणा करण्याची दुसरी एक तर्‍हा असते. ते आह्मांला सांगतात कीं हे सारे पशु आह्मीं मारून खावेत ह्मणून निर्माण केले आहेत, आणि हें जग मनुष्यांच्या उपभोगासाठीं केलें आहे. हा सारा मूर्खपणा होय. अशा रीतीनें एखादा वाघ सुद्धां ह्मणेल कीं, "मनुष्य हा

माझ्याकरितां निर्माण केला आहे." आणि तोही प्रार्थना करील "हे प्रभो! माणसें हीं किती दुष्ट आहेत पहा! कीं तीं आपणहून येऊन आमच्या पुढें खाण्यासाठीं उभीं राहत नाहींत; आणि तीं तुझा आज्ञाभंग करितात!" जग जर आमच्याकरितां निर्माण केलें असेल, तर आह्मीही जगाकरितां निर्माण झाले असूं. जग हें आमच्या उपभोगाकरितां केलें आहे अशी मनाची समजूत होणें, ही अत्यंत दुष्ट कल्पना असून ती आपल्या अधोगतीस कारण आहे. जग हें आमच्याकरितां नव्हे; प्रत्येक वर्षीं त्यांतील लक्षावधि लोक पार जातात, व पुन्हा लक्षावधी लोक नवे येऊन त्यांची जागा भरितात. त्याचा जगाला विधीही नाहीं आणि निषेधही नाहीं. जग जितकें आमच्याकरितां आहे, तितपतच आह्मी जगाकरितां आहों.

ह्याकरितां यथायोग्य काम करणें तर प्रथमतः आपण अलिप्ततेची कल्पनाच सोडून दिली पाहिजे. दुसरें, झगड्यांत मिसळूं नये. साक्षीदार समजून कर्म चालूं द्या. माझे वृद्ध गुरु ह्मणत असत "दाई

मुलांवर ज्या दृष्टीनें पाहते, तितक्याच दृष्टीनें तुह्मी आपल्या मुलांकडे पहा." दाई तुमचें मूल घेते; त्याचे लाड करते; त्याच्याशीं खेळते; आणि त्याच्यावरोबर इतक्या ममताळूपणानें वागते कीं जणों काय तें मूल तिचेंच; पण तिला तुह्मी कामावरून दूर केल्याचें सांगा, कीं ती लगेच आपलें बाडबिछाइत घेऊन बाहेर पडलीच. मोहपाशांत पाडणारी प्रत्येक गोष्ट ती विसरून जाते; तुमचीं मुलें सोडून दुसऱ्याचीं मुलें घेतांना साधारण दाईला यत्किंचित्ही हुंदका येत नाहीं. तुमचें स्वतःचें ह्मणून जें जें तुह्मी ह्मणतां, त्याविषयीं तुह्मींही तसेंच झालें पाहिजे. तुह्मी दाई आहांत; आणि परमेश्वरावर जर तुमचा भरंवसा असेल, तर तुह्मी आपल्या ह्मणून ज्या ज्या वस्तु ह्मणतां, त्या त्या सर्व त्याच्या आहेत. सर्वोत्कृष्टपणा आणि सामर्थ्य ह्यांच्याप्रमाणेंच सर्व अशक्तता ही नेहमीं युक्तियुक्तीनें आंत प्रवेश करीत असते. अमका अमका माझ्यावर अवलंबून आहे, आणि दुसऱ्याचें मला बरें करतां येतें, असें समजणें ही

दुर्बलता होय. असा अभिमान, हीच सर्व आमच्या बंधनाची आई आहे. आणि ह्याच बंधनापासून आमचीं सारीं दुःखें उत्पन्न होतात. आमच्या मनांना आह्मीं असें सांगितलें पाहिजे कीं, ह्या विश्वांतलें एकही कोणी आमच्यावर अवलंबून बसलेलें नाहीं. एखादा भिकारी सुद्धां आमच्या देणगीवांचून खोळंबलेला नाहीं. एकाही जीवानें आमच्या ममतेची अपेक्षा केलेली नाहीं. आणि एकही सचेतन वस्तु आमच्या मदतीवांचून तटलेली नाहीं. सृष्टी ही सर्वांना मदत करते आहे. आणि आमच्यांतील लक्षावधी लोक येथें नसले तरी ती तशीच मदत करीत राहील." तुमच्यासारख्याच्यानें किंवा माझ्यासारख्याच्यानें सृष्टीची राहाटी कांहीं बंद पडावयाची नाहीं. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें दुसऱ्याला मदत करण्याच्या द्वारें आपल्या स्वतःला सुशिक्षित करून घेण्याला मोकळीक दिली आहे. हाच आह्मांस व तुह्मांस आनंदानें दिलेला हक्क होय. आह्मांला आमच्या जन्मामध्यें मोठा शिकावयाचा धडा हाच. आणि तो परिपूर्ण तयार

केला ह्मणजे आह्मी कधींही दुःखी असणार नाहीं. मग आह्मी कोणत्याही व कोठच्याही समाजामध्यें बिनतक्रार मिसळले जाऊं. तुह्मांला बायका असतील; तुमच्याजवळ शिपायांच्या पलटणी असतील, आणि सत्ता करावयाला राज्यें असतील. पण तुह्मीं जर "जग हें आपणाकरितां नाहीं; आणि तें माझ्यावांचून खोळंबलें नाहीं" ह्या तत्वावर काम कराल, तर तीं तुह्मांस त्रास देणार नाहींत. ह्याच वर्षी तुमच्या मित्रांपैकीं कांहीं मित्र मरतील. ते पुन्हा परत येईपर्यंत, जग हें त्यांची वाट पहात बसेल काय? त्याची रहाटी बंद पडेल काय? कधीं पडणार नाहीं. ती चालणारच. ह्मणून जगाकरितां आपण कांहीं करीत आहों, ही मनांतील कल्पना काढून टाका; तिला फांटा द्या; जग हें तुमच्यापासून कोणतीच मदत घेण्याची इच्छा करीत नाहीं. कोणत्याही मनुष्याला मदत करण्याकरितां आह्मी जन्मलों आहों असें वाटणें, हा केवळ पाजीपणा होय. तो शुद्ध अभिमान असून, सद्गुणाच्या रूपानें स्वार्थीपणा मात्र

हळू हळू आंत शिरत असतो. जग आपणांवर किंवा दुसऱ्या कोणावरच अवलंबून राहिलेलें नाहीं, ही कल्पना टाकून देण्यासारखें जेव्हां तुह्मी आपल्या मनाला व स्नायूंना शिक्षण द्याल, तेव्हां कर्मापासून दुःखरूपानें होणारी प्रतिक्रियाही होणार नाहीं. आपण एखाद्या मनुष्याला कांहीं तरी दिलें, तर त्याचा मोबदला मिळण्याची कांहींएक अपेक्षा ठेऊं नये. त्या मनुष्यानें आपले उपकार मानावेत ह्याची सुद्धां आशा करूं नये. ह्मणजे त्याचा कृतघ्नपणा सांगण्याचाही तुह्मांला प्रसंग यावयाचा नाहीं. कारण, तुह्मीं कधीं कशाचीच आशा ठेवलेली नसते, आणि मोबदल्याच्या रूपानें परत घेण्याच्या आपल्या हक्काचाही विचार केलेला नसतो. त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला तुह्मी देऊन टाकतां. त्याचें कर्मच त्याला मिळवून देतें. तुमच्या कर्मानें तुह्मांला त्याचे वाहक बनविले होते. कांहींतरी धर्म करतांना आपण गर्व तरी कां करावा? पैसा किंवा दुसरी कांहीं देणगी जी आपण देतों, तिचे वाहून नेणारे आपण, हे निखालस

हमाल आहोंत. आणि जग हें आपल्या कर्माप्रमाणें योग्य तेवढें मिळवितें. मग आपणांस गर्व किंवा अभिमान वाटण्यास कारण कोठें राहिलें? आपण जें कांहीं जगाला देतों, त्यांत फार मोठें असें कांहींच नाहीं. अलिप्ततेचें ज्ञान तुह्मीं संपादन केलें, ह्मणजे तेथें तुह्मांला चांगलें व वाईट कांहींच होणार नाहीं. चांगल्याच्या आणि वाइटाच्या फरकाला कारण फक्त स्वार्थीपणा आहे. हें समजावयाला फार कठीण जातें. पण तुह्मांला कधीं तरी तें शिकण्याचा प्रसंग येईल. कारण, अशा प्रकारच्या अभ्यासाला तुह्मीं त्याला मोकळीक देईपर्यंत तुमच्यावर विश्वाचाही अंमल चालणार नाहीं. तो अहंकार वेडा होऊन स्वातंत्र्य गमावीपर्यंत मनुष्याच्या आत्म्यावर (अहंकारावर) कोणतीच सत्ता चालत नाहीं. ह्मणून, कर्मापासून तुह्मांवर होणाऱ्या कोणत्याही परिणामाचा, अलिप्तपणानें तुह्मी पराजय व त्याग करावा. आपण तसें करण्यास मोकळीक देईपर्यंत, कर्माला आपल्यावर अंमल करण्यास अधिकार नाहीं, हें ह्मणणें फार सोपें आहे. पण

जो खरोखर कर्माला आपल्यावर कोणताच अंमल करण्यास परवानगी देत नाहीं, जो बाह्य जगानें आपणावर कार्य केलें तरी सुखी किंवा दुःखी होत नाहीं, अशा मनुष्याचें विशेष लक्षण तरी कोणतें? तें लक्षण ह्मणजे हेंच कीं, ज्याच्यावर पर्वत कोसळून त्याचे तुकडे तुकडे झाले, अथवा सुखातिशयाचे देखावे त्याच्यापुढें येऊन उभे राहिले, किंवा अत्यानंदाच्या गोष्टी त्याच्या संबंधानें घडून आल्या, तरी त्याच्या मनाला लेशमात्रही बदल होत नाहीं. त्यास संपत्ति प्राप्त होवो किंवा विपत्ति प्राप्त होवो, दोहोंतही तो सारखा असतो. हरएक स्थितींत त्याचे व्यापार सारखे चालू असतात.

हिंदुस्थानामध्यें **व्यास** ह्मणून एक महाज्ञाता होऊन गेला. हा—**व्यास**, महान् साधु असून तो वेदांतसूत्रांचा कर्ता असल्याविषयीं प्रसिद्ध आहे. त्याच्या बापानें आपण परिपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठीं खटपट केली, पण ती त्यास प्राप्त झाली नाहीं. त्याच्या आजानेंही तसाच प्रयत्न केला होता; पण तोही

शेवटास गेला नाहीं. तो स्वतःही परिपूर्ण होण्याविषयीं पुष्कळ झटला, पण त्यासही तें साधलें नाहीं. परंतु त्याचा पुत्र शुक हा मात्र जन्मतःच परिपूर्ण निपजला. व्यासानें आपल्या मुलाला विद्या शिकविली, आणि आत्मस्वरूपाचें खरें ज्ञान करून दिल्यानंतर त्यानें त्यास जनक राजाच्या सभेंत पाठविलें. हा राजा फार मोठा असून त्याला "विदेह" अशी संज्ञा होती. "विदेह" ह्मणजे देहापासून अतीत—अलिप्त—असा अर्थ. तो जरी राजा होता, तरी आपणास देह आहे, ह्याचेंही त्याला स्मरण नव्हतें. त्याला नेहमीं आपण आत्मस्वरूपच आहों असें वाटत असे. हा शुक मुलगा, त्याच्याकडे शिक्षण घेण्यासाठीं पाठविला होता. व्यासाचा मुलगा आपल्याकडे कांहीं तत्वज्ञान शिकण्यासाठीं येत आहे, हें वर्तमान जनकराजास पूर्वींच कळलें होतें. ह्मणून त्यानें त्याची कांहीं विशेष प्रकारची व्यवस्था आधींच ठेविली होती. आणि तो मुलगा जेव्हां प्रत्यक्ष येऊन राजद्वाराशीं दाखल झाला, तेव्हां देवडीवरच्या प-

हारेकऱ्यांनीं त्याची कोणत्याच प्रकारची विचारपूस केली नाहीं. फक्त एका जागीं आसन देऊन बसावयास मात्र सांगितलें. तो तेथें एकसारखा तीन रात्रीं आणि तीन दिवस बसून राहिला, पण त्याच्या बरोबर कोणीही बोलेना. तूं कोण? कोठून आलास? हें सुद्धां त्यास कोणीं विचारिलें नाहीं. तो एका मोठ्या ज्ञात्याचा मुलगा होता; त्याच्या बापाला सारा देश पूज्य मानीत होता; आणि तो स्वतःही अत्यंत सन्माननीय होता. तरी, त्या पहाऱ्यावरच्या हलक्या व अडाणी शिपायांनीं त्याची मुळीं दाद सुद्धां घेतली नाहीं. तीन दिवस गे-ल्यानंतर एकाएकीं राजाचा प्रधान आणि दुसरे मोठ-मोठाले अधिकारी तेथें येऊन त्यांनीं त्याचा फारच गौरव केला. ते त्याच्या पुढें होऊन त्याला आंत घेऊन गेले. आणि त्यास रहावयास उत्तम सुशोभित जागा दाखवून दिली. त्याला सुगंधी उटणीं लावून उत्तम स्नान घातलें, व उंची पोशाख घालावयास दिला. ह्याप्रमाणें आठ दिवसपर्यंत त्याला त्यांनीं मोठ्या ऐष-आरामांत ठेवलें. पण अशा सुखांत एक वेळ तरी त्या

शुकाच्या शांत आणि गंभीर मुद्रेंत, त्यामुळें यत्किंचित्‌ही अंतर पडलें नाहीं. तो दरवाजावरील पहाऱ्यांत जसा होता, तसाच ह्या ऐषआरामांतही होता." नंतर त्याला राजसभेंत नेलें. राजा सिंहासनावर बसला होता व त्याच्यापुढें वाद्यें वाजत असून नृत्यगायन सुरू होतें. राजानें त्याच्या हातांत काठोकाठ भरलेला एक दुधाचा पेला दिला आणि सांगितलें कीं, ह्या दुधाचा एक थेंबही न सांडतां ह्या सभेच्या भोंवतीं प्रदक्षणा घाल. त्या मुलानें तो पेला घेतला आणि त्या वाद्यांमधून आणि सुंदर सुंदर स्त्रियांमधून चालला. आणि राजानें सांगितल्याप्रमाणें त्यानें सात प्रदक्षणा घातल्या. परंतु एकही दुधाचा थेंब सांडला नाहीं. त्या मुलाचें मन—त्यानें परवानगी दिल्याशिवाय—जगांतील कोणत्याही पदार्थांनीं ओढलें जात नव्हतें. तो पेला त्यानें राजाकडे आणिला तेव्हां त्याच्याकडे पाहून राजा त्यास ह्मणाला "तुझ्या बापानें तुला काय शिकविलें, आणि तूं स्वतः काय काय शिकलास, त्याची ही केवळ चांचण पाहिली. त्यावरून तुला सत्यज्ञान—

झालें आहे अशी खात्री झाली. ह्याकरितां तूं आतां आपल्या घरीं जा. ”

अशा प्रकारें ज्यानें स्वतःवर आपला अंमल बसविण्याचा अभ्यास केला असतो, त्याच्यावर बाहेरच्या कोणत्याच कार्यांचा परिणाम घडत नाहीं. त्याच्या साठीं पुन्हा त्याला गुलामगिरी करावी लागत नाहीं. त्याचें मन मुक्त होतें. असा मनुष्य असेल, तोच जगामध्यें नीट रीतीनें वागण्यास योग्य आहे. जगामध्यें आपणास मनुष्यांनीं बहुधा दोन मतें ग्रहण केल्याचें आढळून येतें. कांहीं जगास नांवें ठेवणारे लोक आहेत. ते ह्मणतात कीं “किती भयंकर आणि दुष्ट आहे हें जग!” दुसरे किती एक जगास चहाणारे असतात. ते ह्मणतात कीं “किती सुंदर आणि आश्चर्यमय जग आहे हें!” ज्याचें मन ताब्यांत नाहीं, त्याला जग हें वाईटानेंच भरलेलें किंवा चांगल्या वाइटाच्या मिश्रणाचेंच आहे. आणि आह्मी आपल्या मनाचेच धनी बनूं, तेव्हां हें जग आपणांस सुंदर आहे. मग आह्मांवर कोणतेंच कर्म, चांगले किंवा वाईट परिणाम करणार

नाहीं. प्रत्येक वस्तू जेथल्या तेथें,–जशीच्या तशीच व जुळून दिसूं लागेल. कांहीं मनुष्यें, जगाला जीं केवळ नरक असें मानतात, तींच जर आपल्या मनावर अंमल ठेवतील, तर अखेर तींच ह्या जगाला स्वर्ग ह्मणतील. आह्मी जर अस्सल कर्मयोगी झालों आणि ही स्थिति प्राप्त करून घेण्याचा अभ्यास करण्याची इच्छा धरिली, तर जेथें तेथें आह्मीं निखालस अहंता सोडून कर्मारंभ केला पाहिजे. हा दिखाऊ अहंकार लयास गेला कीं, लगेच, जें जग वाईटानें भरलेलें दिसत असतें, तें स्वर्गाप्रमाणें दिसून त्यांत सारा आनंदच भरलेला दिसतो. त्याचें सारें वातावरणही आनंदमयच असतें. तेथें प्रत्येक मनुष्याचा चेहरा सुद्धां गोड असतो. कर्मयोगाचा हेतु आणि फल असें आहे. आणि जन्मव्यवहाराची परिपूर्णता ती हीच. आमचे निरनिराळे योग, परस्परांत झगडत नाहींत. त्यांतील प्रत्येक आपणांस एकाच ठिकाणीं नेतो, आणि आह्मांस परिपूर्ण करतो. त्या प्रत्येकाचा, परिश्रमानें अभ्यास मात्र केला पाहिजे. खुबी जी काय आहे, ती अभ्यासांत आहे. प्रत्येक यो-

गाला हेंच तत्व लागू. आपण प्रथमतः त्याच्याबद्दल सारें ऐकून ठेवावें; नंतर काय आहे त्याची समजूत घ्यावी. पुष्कळ गोष्टी आपणांस समजणार नाहींत; पण त्या नेहेमीं ऐकण्याचा आणि विचार करण्याचा रावता ठेवला ह्मणजे समजूं लागतील. कोणतीही गोष्ट एकदम समजण्याला कठिणच पडते. प्रत्येक गोष्टीचा खुलासा सर्वांपेक्षां अधिक, असा आपल्या मध्येंच होतो. खरें पाहिलें तर दुसऱ्यापासून कोणीच कांहीं शिकत नाहीं. आपल्यांतील प्रत्येक मनुष्य, आपण आपल्यालाच शिकवितो. अंतस्थ गुरूला विषय नीट समजून घेण्याला, व त्यानें उठून कामास लागावयाला, बाह्य शिक्षक हा फक्त सूचना देतो किंवा जागृत करतो. नंतर सर्व विषय आमच्या पूर्ण ज्ञानशक्तीनें आणि विचारानेंच आह्मांस समजत जातात. आणि मग आह्मी त्या आमच्या आत्म्यापासून मुक्त होतों. शिवाय, ती मुक्तता वाढून वाढून एक प्रचंड इच्छाशक्ति बनते. प्रथम ती ज्ञानरूप असते; नंतर ती इच्छारूप होते; आणि त्या इच्छाशक्तींतूनच कर्म करण्याची अचाट

शक्ति उद्भवते. ती इच्छा प्रत्येक ज्ञानतंतूंतून व प्रत्येक स्नायूंतून जाते. आणि शरीराचा सारा गोळाच कर्माच्या स्वार्थत्यागयोगाचें हत्यार—आयुध—बनून राहतो—आणि पूर्ण अहंकारत्याग जें इच्छित फल, तें प्राप्त होतें. इतकेंच नव्हे, तर पूर्ण स्वार्थत्याग, यथायोग्य रीतीनें प्राप्त होतो. हा लाभ कोणत्याही पंथावर, मतावर, किंवा विश्वासावरही अवलंबून राहत नाहीं. तो ख्रिस्ती असो; ज्यू असो; किंवा कोणीही असला तरी हरकत नाहीं. तुह्मी स्वार्थत्यागी आहां काय? एवढाच काय तो प्रश्न. तेवढे तुह्मी असलां, तर कोणतें एकही धर्मपुस्तक वाचल्याशिवाय, कोणत्याही देवालयांत किंवा प्रार्थनामंदिरांत गेल्याशिवायच पूर्णत्वास पोंचाल. आमच्या योगांपैकीं प्रत्येक योगाच्या आंगीं, दुसऱ्याच्या मदतीशिवायच मनुष्याला पूर्णत्वास पोंचवावें, अशी योग्यता आहे. कारण, त्यांचा जाण्याचा रोख एकाच ठिकाणाकडे आहे. कर्मयोग, ज्ञानयोग, आणि भक्तियोग इत्यादि सर्व स्वतंत्र रीतीनें आणि एकदम मोक्ष मिळविण्याला साधनीभूत होतात. "मूर्ख आहेत

तेच कर्म आणि ज्ञान हीं निरनिराळीं आहेत असं ह्मणतात. शहाणे लोक तसें ह्मणत नाहींत.” ते दिसण्यांत जरी भिन्नभिन्न दिसतात तरी, अखेर मनुष्याला परिपूर्णत्वाला पोंचविण्याचा जो रोंख, तो सर्वांचा एकच आहे. आणि अखेर ते सारे तेथेंच नेणार हें ज्ञानी लोकांस समजतें.

---

# भाग सातवा.

## मुक्ति.

“कर्म” ह्या शब्दाचे अर्थ सांगतांना आह्मीं कळविलेंच आहे कीं, मानसशास्त्ररीत्या ‘कर्म’ हा शब्द ‘कारण किंवा ‘निमित्त्य’ या अर्थींही योजितात. कोणतेंही काम, कोणताही व्यापार, कोणताही विचार,—ज्याच्यापासून कांहीं तरी कार्य ह्मणून घडतें, कांहीं तरी परिणाम होतो—त्याला कर्म असें ह्मणतात. ह्यावरून कर्माचें बंधन किंवा नियम

ह्मणजे निमित्ताचे, अपरिहार्य कारणाचे, व कारणांच्या मालिकेचेच नियम होत. जेथें जेथें कारण ह्मणून आहे तेथें तेथें कार्य हें उत्पन्न झालेंच पाहिजे. त्याला कशानेंच बाध येणार नाहीं. हा कर्माचा नियम आमच्या शास्त्राप्रमाणें सर्व जगभर खरा ठरलेला आहे. आह्मी जें जें पाहतों; आह्मांस जें जें वाटतें; आह्मी जें जें करतों, कार्य ह्मणून जें जें आहे, तें तें जगामध्यें सर्वत्र आहे. तसेंच, एका प्रसंगीं संचित कर्माचें जें कार्य असतें, त्यावरच दुसऱ्या प्रसंगीं कारण होण्याची पाळी येते. आणि तें आपलें स्वतःचें कार्य उत्पन्न करण्यास कारणीभूत होतें. ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या ह्मणजे "नियम" किंवा "बंधन" ह्याच्या अर्थाचा विचार करणें भाग पडतें. मानसशास्त्ररीत्या नियम ह्याचाच अर्थ 'एकाच गोष्टीची पुनरावृत्ति होण्याचा जो धर्म तो'— हें आपणांस समजतें. एकीच्या मागून दुसरी गोष्ट घडलेली, किंवा कधीं कधीं दुसरीच्या सदृश घडलेली आपण पाहतों, तेव्हां तशाच गोष्टी पुन्हा पुन्हा घडलेल्या पाहण्याची आपणांस उत्कंठा उत्पन्न होते. आमचे जुने

तर्कशास्त्री व न्यायशास्त्रवेत्ते, ह्या नियमाला 'व्याप्ति' असें ह्मणत. त्यांच्या मताप्रमाणें आमच्या नियमांच्या कल्पनांची एकवाक्यता होणें शक्य आहे. चमत्कार-मालिका ह्या आमच्या मनांतील गोष्टीशीं कांहीं एका विलक्षण रीतीनें साम्यता पावतात. अशा कीं, केव्हांही आह्मी जें काय पाहतों, त्याची मनांतील इतर गोष्टींशीं तेव्हांच साक्ष पटते. कोणतीही कल्पना–किंवा आमच्या मानसशास्त्राप्रमाणें लहर–मनस्संचयामध्यें–चित्तामध्यें उत्पन्न होते ती, नेहेमीं दुसऱ्या अनेक लहरी उत्पन्न करीत असली पाहिजे. एकवाक्यतेची मानसिक कल्पना हीच. आणि निमित्त हें, फक्त ह्या एकवाक्यतेच्या विशाळ आणि व्यापकतत्त्वाचें स्वरूप होय. एकवाक्यतेची जी व्यापकता, तिलाच संस्कृतामध्यें 'व्याप्ति' असें ह्मटलेलें आहे. ब्रह्मांडांतील बंधनाची कल्पना, हुबेहुब पिंडांतील कल्पनेप्रमाणेंच आहे. आणि एका विशेष चमत्काराची उत्कंठाही दुसऱ्यासारखीच असते. आणखी, ही सर्व मालिका इतकी पुन्हा पुन्हा दृष्टीस पडते कीं, ती

आपणांस स्पष्टपणें पहावयास मिळेल. ह्यावरून पाहतां खऱ्या दृष्टीनें ह्मटलें तर, बंधन किंवा नियम हा सृष्टीमध्यें मुळींच नाहीं. पृथ्वीमध्यें गुरुत्वाकर्षण आहे, किंवा सृष्टीमध्यें कोणताही नियम प्रगट झालेला दिसतो; असें ह्मणण्याचा जो प्रघात आहे, ती चुकी होय. नियम किंवा बंधन ही एक पद्धति आहे; रीति आहे; तिच्यामध्यें आमचें मन, एका विविक्षित चमत्कृतीची मालिका ग्रहण करतें. ती सारी मनामध्येंच असते. एखादा चमत्कार एकामागून एक, किंवा एकदम घडतांना, त्याच्या नियमितपणाविषयीं खात्री पटवून घेऊन आमचीं मनें साऱ्या मालिकांची रीति ग्रहण करण्यास समर्थ होतात. ह्याच कृतीला आह्मी बंधन किंवा नियम असें ह्मणतों.

आतां दुसरा विचार करण्यासारखा प्रश्न असा येतो कीं, हें बंधन आह्मी विश्वव्यापी आहे ह्मणतों हें कसें? आमचें विश्व हें, संस्कृत मानसशास्त्रवेत्ते ज्याला देश, काळ, व निमित्त असें ह्मणतात—किंवा युरोपियन मानसशास्त्राप्रमाणें ज्याला स्पेस, टाइम, आणि

कॉझेशन् असें ह्मणतात-त्याच्या योगें बनलेलें जें अ-स्तित्व-दृश्यजग-त्याचा एक अंश आहे. हें विश्व ह्मणजे अनंत ब्रह्मांडाचा एक भाग. एक अंश एका विविक्षित सांचांत टाकलेला, किंवा देश, काल, व निमित्त मिळून झालेला. हा जो सर्वांपैकीं एका सांचांत पडून निदर्शनास आलेला अंश, तेंच आमचें विश्व. ह्यावरून हें अगदीं ओघास येतें कीं, बंधन किंवा नियम ह्मणून जे काय ते ह्या मर्यादित विश्वाच्या आंतच असले पाहिजेत. त्याच्या पलीकडे कोणताही नियम किंवा बंधन असूं शकणार नाहीं. आह्मी विश्वाच्या संबंधानें जेव्हां जेव्हां बोलतों, तेव्हां तेव्हां आमच्या मनाच्या आटोक्यांत जेवढा अस्तित्वाचा भाग असतो, तेवढ्यावद्दलच आह्मी बोलत असतों. आह्मांला जेवढें पाहतां येतें; आह्मांला जेवढ्याचा विचार करतां येतो; आह्मांला ज्यास स्पर्श करतां येतो; आह्मांला जेवढें ऐकूं येतें; आह्मांला ज्याच्याविषयीं कल्पना करतां येते; तेवढेंच काय तें आमच्या इंद्रियज्ञानाचें विश्व— आणि तेंच विश्व काय तें बंधनाखालीं असतें. पण

त्याच्या पलीकडे जें काय आहे, त्याला हें बंधन व नियम लागू नाहींत. कारणांचा किंवा निमित्तांचा विस्तार, आमच्या मनांच्या विश्वाबाहेर नाहीं. आमच्या मनाच्या आणि इंद्रियविशिष्ट ज्ञानमर्यादेच्या बाहेरची कोणतीही गोष्ट, निमित्तांच्या बंधनानें बांधलेली नाहीं. कारण, इंद्रियज्ञानाच्या पलीकडच्या प्रदेशांत पदार्थांची आणि मनाची सांगड नाहीं. आणि कल्पना समुदायाशिवाय निमित्त नाहीं. तें फक्त प्राणी असतांना, किंवा नामरूपाच्या सांच्यांत पडून त्याला अस्तित्व येतें तेव्हांच तो निमित्ताचें बंधन पाळतो. आणि तोच बंधनांत पडला आहे असें ह्मणतात. कारण सर्व बंधनांचें मूळ निमित्तामध्यें आहे. ह्मणून आपणांस तत्काल कळून चुकतें कीं, तेथें स्वतःसिद्ध—स्वेच्छ— अशी कोणतीच गोष्ट नाहीं. केवळ शब्द हा एक विपर्यास आहे. कारण, आमच्या समजाप्रमाणें इच्छा, आणिं आपणांस माहित असलेली प्रत्येक वस्तु आमच्या विश्वाच्या आंतीलच असते. आणि आमच्या विश्वांतील प्रत्येक वस्तु तर, देश, काल, व निमित्त ह्यांनीं

तयार झालेली आहे. प्रत्येक वस्तु जी आपण जाणतों, किंवा आपणांस जाणतां येण्यासारखी असते, ती निमित्ताची तावेदार असली पाहिजे. आणि जी वस्तु निमित्ताचीं बंधनें पाळते, ती मुक्त होऊं शकणार नाहीं. तिच्यावर दुसऱ्या कोणाचें कार्य घडलें ह्मणजे तिला स्वतःच निमित्तरूप होण्याची पाळी येते. आणि जी पूर्वीं इच्छारूप नसते, ती इच्छारूप होते. पण जी ह्या देश, काल, व निमित्ताच्या सांचांत पडून मनुष्याचें इच्छारूप बनते, ती मुक्त होते. आणि हीच इच्छा जेव्हां देश, काल व निमित्त ह्यांच्या तडाक्यांतून सुटते, तेव्हां ती पुन्हां मुक्त होते. मुक्ततेपासूनच ती येते; बंधनामध्यें तिचा ठसा उमटतो; त्यांतून ती बाहेर पडते आणि पुन्हा परत मुक्तीला पोंचते.

तेव्हां असा प्रश्न येतो कीं, हें विश्व येतें कोठून, तें राहतें कोठें, आणि जातें कोणीकडे? ह्याचें उत्तर असें दिलेलें आहे कीं, तें मुक्तीपासून येतें, बंधनामध्यें राहतें; आणि पुन्हा मुक्तीमध्येंच जातें. ह्याकरितां आह्मी मनुष्याविषयीं जेव्हां ह्मणतों कीं, स्वतःच प्रगट

झालेला जो हा जीवेश्वर त्याच्या पलीकडे कांहीं नाहीं, तेव्हां तें बोलणें, फक्त त्यापैकीं एक लहानसा अंश जो मनुष्य त्याच्याविषयींच असतें. हें शरीर आणि मन जें आह्मी जाणतों, तें परमात्म्याचा फक्त एक अंश आहे. तो परमात्म्याचा केवळ एक बिंदु होय. आणि विश्व हें सर्व परमात्म्यांतील एक परमाणूच; आणि आमचीं सर्व बंधनें; आमचे सर्व नियम; आमचीं सुखें आणि दुःखें; आमचें सौख्य आणि उत्कंठा ह्या सर्व या एका विश्वांत आहेत. आमच्या सर्व उन्नति आणि अवनती, त्याच्या एका लहानशा मंडळांत आहेत. ह्मणून हें जग निरंतर असेंच चालेल, आमचीं शरीरें अशींच उत्पन्न होतील, आणि आपल्याला माहित असलेल्या जगाचें केवळ प्रतिबिंब असा जो स्वर्ग, तो प्राप्त होईल अशी आशा करणें, हा केवढा पोरकटपणा आहे, हें आपणांस समजेलच. बंधनांत गुंतलेल्या, व मर्यादित असलेल्या आमच्या विश्वाला, सर्वव्यापक परमात्म्याच्या रूपाशीं सदृश बनविणें ही गोष्ट केवळ अशक्य व पोरकट असल्याचेंही, तत्काल आपल्याला ध्यानांत

येईल. ह्मणून जेव्हां जेव्हा एखादा मनुष्य, जें आज त्याच्या जवळ आहे, तेंच सदोदित असावें, व त्याचीच प्राप्ति वारंवार व्हावी, असें इच्छितो, किंवा माझ्या नेहेमींच्या परिपाठाप्रमाणें ह्मटल्यास, त्याला जेव्हां सुखदायक धर्म असावासा वाटतो तेव्हां, हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, तो इतक्या शोचनीय स्थितीला (अधोगतीला) पोंचलेला असतो कीं, त्याला, तो असतो त्याच्या पलीकडे कांहीं दिसत नाहीं. त्याच्या ज्ञानदृष्टिकक्षेची मर्यादा–तीच–ह्मणजे आज जी कांहीं त्याची सुखदायक स्थिति आहे तेवढीच. तिच्या पलीकडे एक तिळभरही नसते. त्याच्या सभोंवार ज्या काय लहान लहान वस्तु असतात, तेवढ्यांचाच तो न्याय करतो. अधिक कांहीं नाहीं. तो आपल्या मुळच्या अनंत स्वरूपाला विसरतो, आणि त्याची सारी कल्पना ह्या क्षणभंगुर हर्षशोकाला आणि अंतःकरणाच्या मात्सर्याला चिकटून राहते. ही समर्याद वस्तु तीच अनंत असें वाटतें. इतकेंच नव्हे, तर ह्या मूर्खपणाला तो विसंबत सुद्धां नाहीं. तो तृष्णेमध्यें अगदीं गुंतून पड-

लेला असतो. जीव गेला तरी, त्याची तृष्णा असतेच. हिला बौद्ध धर्मी लोक 'तृषा' किंवा 'तहान' असें ह्मणतात. लक्षावधि प्रकारचीं सुखें, लक्षावधि प्रकारचे प्राणी, लक्षावधि प्रकारचे नियम, लक्षावधि प्रकारच्या उन्नति, आणि लक्षावधि प्रकारचीं निमित्तें आह्मांला ज्ञात असणाऱ्या ह्या लहानशा विश्वाच्या बाहेर असतील, आणि तीं आपआपलें कार्य करित असतील. पण हीं सर्व आमच्या सृष्टीचाच एक भाग होत.

आह्मांस मुक्ति मिळवावयाची असेल तर, ह्या विश्वमर्यादेच्या बाहेर गेलें पाहिजे. ती येथें प्राप्त होणार नाहीं. पूर्ण समता—किंवा ख्रिस्ती लोक जिला सर्व ज्ञानातीत असणारी शांति असें ह्मणतात ती—ह्या विश्वांत, किंवा स्वर्गांत, किंवा ज्या ठिकाणीं आमचें मन व विचार जाऊं शकतात, त्यांतील कोणत्याही ठिकाणीं, किंवा जेथें स्पर्शज्ञान जाणवतें, त्या ठिकाणीं, किंवा जेथें कल्पना ग्रहण करतां येते त्या ठिकाणीं मिळावयाची नाहीं. असल्या कोणत्याही ठिकाणीं ती मुक्ति आह्मांस सांपडावयाची नाहीं. कारण, असलीं सर्व

स्थळें आमच्या विश्वांतच आहेत, आणि तीं देश, काल, व निमित्त ह्यांनीं बद्ध झालेलीं आहेत. आमच्या पृथ्वीपेक्षां अधिक सूक्ष्म द्रव्यांचीं स्थळें असतील, आणि त्यांच्यावर अधिक ऐषआराम असेल, पण तीं स्थळें सुद्धां विश्वापैकींच होत. तेव्हां तेथेंही नियमांचें बंधन असलेंच पाहिजे. तेव्हां आह्मांला ह्या विश्वाच्या बाहेर गेलें पाहिजे. कारण, ह्या सूक्ष्म विश्वाचा जेथें लय होतो तेथेंच खऱ्या धर्माचा प्रारंभ. हे क्षुद्रानंद, दुःखें, आणि वस्तूंचें ज्ञान हीं तेथें लयास जातात, आणि सत्तत्वांचा प्रारंभ होतो. आपल्या जीवाशीं बाळगलेली तृष्णा, आमच्या क्षणिक आणि मर्यादित अस्तित्वाशीं असलेलें दृढतर बंधन, हीं सोडीपर्यंत त्यांच्या पलीकडील अपरंपार मुक्तीपैकीं एक बिंदूही मिळण्याची आशा करणें नको. ह्यावरून येवढाच विचार मनांत येतो कीं, मनुष्यजातीच्या सर्व आशांपैकीं अत्यंत श्रेष्ठ आशा जी मुक्ति, ती मिळविण्याला एकच मार्ग आहे. तो मार्ग ह्मणजे हा कीं, हा क्षुद्र जन्म सोडून देणें, ह्या लहान विश्वाचा अव्हेर करणें, ह्या लहान पृथ्वीचा त्याग

करणें, स्वर्गाला तुच्छ मानणें, शरीराची पर्वा न करणें, मनाला दूर लोटणें, आणि जी जी ह्मणून समर्याद व बंधनयुक्त वस्तु आहे, ती ती सर्व झुगारून देणें हा होय. ह्या आमच्या स्पर्शज्ञानजन्य लहानशा जगाशीं किंवा मनाशीं असलेला आमचा लागाबांधा जर आह्मीं सोडून दिला, तर तत्काल आह्मी मुक्त होऊं. बंधनांतून सुटण्याला मार्ग एकच. तो हा, कीं, नियमांच्या मर्यादेच्या पलीकडे आणि निमित्ताच्या अमलाच्या बाहेर जाणें.

पण ह्या विश्वाची चिकाटी सुटणें हें महाकर्म कठीण आहे. तें फारच थोड्यांना साधतें. आमच्या ग्रंथांतून त्याला दोन मार्ग सांगितलेले आहेत. एक 'नेति' 'नेति'—हें नको, हें नको—हा. आणि दुसरा 'इति' 'इति' हा. पहिला निषेध ह्मणजे त्याग. आणि दुसरा कर्ममार्ग. निषेध किंवा त्याग अतिशय दुष्कर आहे. हा मार्ग फक्त जे लोकोत्तर व अत्युच्च मनाचे लोक असतात; ज्यांची निश्चयशक्ति प्रचंड; ज्यांनीं सहज उभें राहून 'हें मला नको' ह्मटलें, तर जवळ येण्याची कोणाची मगदूर नाहीं. ज्यांचें शरीर आणि मन त्यांची आज्ञा

झेलण्यास जसें काय हुकुमबंदें. असे असतील तेच ह्या मार्गानें पल्ला गांठतात. पण असे लोक फारच विरळा. मानवजातींतील बहुजनसमाज कर्ममार्गालाच अनुसरतो. हा मार्ग जगांतूनच असून तो बंधनानेंच बंधनें तोडतो. हाही एक प्रकारचा त्यागच आहे. इतकेंच कीं, तो हळू हळू आणि आस्ते आस्ते प्राप्त होतो. वस्तुमात्राच्या ज्ञानानें, पदार्थांच्या उपभोगानें, नानाप्रकारचे अनुभव घेऊन, पदार्थमात्रांचे धर्म समजून, मन त्याचा अगदीं कंटाळा करीपर्यंत कर्म करावयाचें, ह्मणजे अखेरीस अलिप्तता प्राप्त होते. पहिल्या मार्गानें अलिप्तता प्राप्त होते, ती विचारानें प्राप्त होते; आणि दुसऱ्या मार्गानें प्राप्त होते ती, कर्मानें आणि अनुभवानें प्राप्त होते. पहिला मार्ग ज्ञानयोगाचा, आणि कर्माची कोणतीच इमारत न उभारतां तयार केलेला, आणि दुसरा कर्मयोगाचा होय. त्यांत कर्म करण्याला प्रतिबंध ह्मणून नाहीं. ह्मणून विश्वामध्यें प्रत्येकानें कर्म हें केलेंच पाहिजे. फक्त जे कोणी आत्म्यावरच परिपूर्ण संतुष्ट असतात; ज्यांची इच्छा आत्म्याच्या पलीकडे

कधीं जातच नाहीं; ज्यांचें मन आत्म्याचा रस्ता कधीं चुकतच नाहीं; ज्यांना आत्मा हेंच काय तें सर्वस्व; ते मात्र करीत नाहींत. बाकी सर्वांना कर्म हें केलेंच पाहिजे. एखादा प्रवाह आपल्या स्वभावधर्माप्रमाणें मनसोक्त वाहत असतां एखाद्या खळग्यांत पडतो. तेथें थोडासा भोंवऱ्याप्रमाणें गिरकी खाऊन पुन्हा प्रवाहाच्या रूपास येतो आणि निष्प्रतिबंध चालता होतो. प्रत्येक मनुष्याचा जन्म हा त्या प्रवाहासारखा आहे. तो भोंवऱ्यांत सांपडतो, देश, काल, निमित्तानें बनलेल्या ह्या जगामध्यें गुरफटतो, थोड्याशा गिरक्या खातो, माझा बाप, माझा भाऊ, माझें नांव, माझी कीर्ति, इत्यादि ह्मणून आरडतो, आणि अखेर त्यांतून बाहेर पडून पुन्हा मुक्त स्थितींत जातो. सारें विश्व हेंच करीत आहे. तें आह्मांला समजो वा न समजो; त्याची आह्मांला इच्छा असो वा नसो; आपण सारे जगाच्या स्वप्नांतून बाहेर पडण्याची खटपट करीत आहोंत. मनुष्याचा जगांतील अनुभवच त्याला त्याच्या भोंवऱ्यांतून बाहेर काढण्यास समर्थ आहे.

पण कर्मयोग ह्मणजे काय? कर्माचें गुप्त ज्ञान ह्याचें नांव कर्मयोग. सारें विश्व कर्म करित असलेलें आपण पाहतों. तें कशाकरितां असें कर्म करतें? सुटका व्हावी, मुक्ति मिळावी ह्मणून. कळून किंवा न कळून प्रत्येक पदार्थ अत्यंत सूक्ष्म परमाणूपासून तों तहत उच्चप्रतीच्या प्राण्यापर्यंत, येवढ्याकरितांच खटपट करित असतो. मनाची, शरीराची, जीवाची आणि प्रत्येक गोष्टीची सुटका व्हावी येवढाच हेतु धरून कर्म चाललेलें असतें. झाडून साऱ्या वस्तु सदा सर्वदा मुक्तता होण्यासाठीं आटापीट करीत असतात; ह्या बंधनापासून दूर दूर पळत असतात. सूर्य, चंद्र, पृथ्वी, तारे हेही बंधनापासूनच मुक्त होण्याची खटपट करीत आहेत. सृष्टीच्या मध्योत्सारिणी आणि मध्याभिगामिनी ह्या गति खरोखर आमच्या विश्वाच्या प्रतिबिंबरूपच आहेत. कर्मयोग हा आम्हांला कर्मांतील गुह्य आणि पद्धत सांगतो. आमच्या जीवानें ह्या विश्वामध्यें धक्के खात नसूं नये, बहुत दिवस कुचमत पडून व आघात सोसून पदार्थ-

मात्राचें यथातथ्य ज्ञान मिळविण्याच्या भरीस पडूं नये ह्मणून आम्हांला कर्मयोग हा कर्मांतील इंगित, कर्माची पद्धति, कर्माची इंद्रियज्ञानविशिष्ट शक्ति शिकवून देतो. कर्माचा उपयोग कसा करावा, त्याची योजना कोठें करावी, हें जर आपणांस माहित नसेल तर, आपली उमेद पुष्कळ अंशीं फुकट जाईल. कर्मयोग हा, कर्माचें एक शास्त्र तयार करतो, आणि त्याच्या योगानें ह्या जगांतील सर्व कर्मांची उत्तम रीतीनें व्यवस्था कशी लावावी, हें कळतें. कर्म हें अनिवार्य आहे, आणि तें तसेंच असलें पाहिजे. परंतु आमचें कर्म आहे तें अत्युच्च हेतूकरतां आहे. कर्मयोग आह्मांस थोरपणास चढवितो. कारण, जग हें केवळ पांच मिनिटांचा बाजार आहे. त्यांतून कांहीं वेळ तरी आह्मांस गेल्यावांचून सुटका नाहीं. आणि मुक्ति आहे, ती येथें नाहीं. तर ती त्याच्या पलीकडे आढळते. जगाच्या बंधनांतून सुटून जाण्याचा रस्ता पाहिजे असेल तर, आह्मांला त्यांतून हळू हळू आणि निश्चयानें गेलें पाहिजें. मीं आतां नुकतेंच सांगितल्या-

प्रमाणें असेही विरळा पुरुष आढळतील कीं, साप आपली कांत दूर फेंकून देऊन बाजूस राहून तिच्याकडे जसा पहात राहतो, तद्वत् असतात. ते जगापासून अलग राहतात. असे लोकोत्तर पुरुष असतात ह्यांत शंका नाहीं. परंतु बाकीच्या राहिलेल्या मनुष्यजातीनें कर्मजालांतून आस्तेआस्तेच गेलें पाहिजे. आणि तें कसें जावें, त्याची रीति, पद्धत, मर्म, हें कर्मयोग, कोणतीही चिंता न राहील अशा रीतीनें दाखवून देतो. तो काय ह्मणतो? " सतत सारखें कर्म करा; पण त्या कर्मावरची आसक्ति सोडून द्या." कोणत्याही वस्तूशीं तुह्मी संलग्न होऊं नका. तुमचें मन निखालस मोकळें ठेवा. हे जे दुःखशोक तुह्मांला दिसतात, त्या ह्या जगाच्या आवश्यक मर्यादा आहेत. दारिद्र्य, संपत्ति आणि सौख्य हीं क्षणिक आहेत. तीं आमच्या सत्य स्वरूपांत मुळींच नाहींत. आमचें स्वरूप दुःख आणि सौख्य ह्यांच्या फार पलीकडे आहे. इंद्रियज्ञानाच्या प्रत्येक गोष्टीपलीकडे आणि कल्पनेच्याही पलीकडे आहे. तथापि सदा सर्वदा आह्मांला कर्म हें करीत राहिलेंच पाहिजे.

"दुःख हें आसक्तीपासून येतें; कर्मापासून येत नाहीं." आह्मी जें कर्म करतों, त्याच्यावर आसक्ति ठेवली न ठेवली, तोंच आमच्या पुढें दुःख हें दत्त करून उभें राहतें. पण आह्मी जर त्याच्याशीं संलग्न झालों नाहीं, तर आह्मांला दुःखही होत नाहीं. दुसऱ्या कोणाची एखादी उत्तम तसवीर असली, आणि ती जर जळून गेली, तर इतर मनुष्यांना तिचें फारसें दुःख होत नाहीं. पण तीच स्वतःची जर तसवीर जळली, तर त्याला किती वरें वाईट वाटतें? तें कां वरें वाटावें? दोन्हीही तसबिरी उत्तमच होत्या. कदाचित् त्या एकमेकींच्या नकलाही असतील. तरी एकीमध्यें दुसरीपेक्षां अतिशय दुःख झालें. ह्याचें कारण, पहिलीमध्यें आपल्या तसबिरीला तो संलग्न होऊन राहिला होता, आणि दुसरींत नव्हता. हेंच सारें 'मी' आणि 'माझें' दुःखास कारणीभूत आहे. आपलेपणाच्या ज्ञानापासून स्वार्थीपणा येतो. आणि तो दुःखाला घेऊन येतो. स्वार्थीपणाचें प्रत्येक कृत्य व प्रत्येक विचार, कशाला तरी आह्मांस चिकटवून ठेवतो,

आणि आह्मी लगेच गुलाम बनतों. चित्तांतील 'मी' आणि 'माझें' ह्मणणारी प्रत्येक लहर, ताबडतोब आमच्या भोंवतीं सांखळदंड वांधून आह्मांला गुलाम करून सोडते. तेव्हां आह्मी अधिकाधिकच 'मी' आणि 'माझें' ह्मणूं लागतों, आणि गुलामगिरींत अधिकाधिकच जखडून जातों. आणि त्याच मानानें आमचीं दुःखें अधिकाधिक वाढत जातात. ह्मणून कर्मयोग आह्मांस सांगतो कीं, जगांतील एकून एक चित्रांच्या सौंदर्याचा तूं उपभोग घे, परंतु त्या सर्वांना किंवा त्यांपैकीं एकाला सुद्धां आसक्त होऊन राहूं नको. माझें असें कधीं ह्मणूं नको. जेव्हां जेव्हां एखादी वस्तु माझी असें ह्मणतों, तेव्हां तेव्हां तत्काल दुःख पुढें उभें राहतें. हें मूल माझें आहे असें मनांत सुद्धां आणूं नको. मुलाचा प्रतिपाळ कर, पण तें माझें असें ह्मणूं नको. माझें ह्मटलेंस कीं, दुःख आलें. माझें घर ह्मणूं नको. माझें शरीर ह्मणूं नको. खरें दुःख जें काय आहे, तें त्यांतच आहे. शरीर हें तुमचेंही नव्हे, माझेंही नव्हे, किंवा कोणाचेंच नव्हे. हीं शरीरें सृष्टिनि-

यमाप्रमाणें येतात, आणि जातात. आह्मी फक्त साक्षीदाराप्रमाणें अगदीं मोकळे आहोंत. हें शरीर चित्रापेक्षां किंवा भिंतीपेक्षां अधिक भिन्न नाहीं. मग एखाद्या शरीराला आह्मीं इतकें चिकटून तरी कां रहावें? एखादा चितारी चित्राला रंग देत असला, तर तो रंग देण्याचें काम पुरें झालें कीं, चालता होतो. तो त्याच्यावर आसक्ति कशाला ठेवील? त्याला जाऊं द्या, मला तें सांभाळलें पाहिजे, असें आपस्वार्थीपणाचें निमित्त पुढें करूं नका. तें पुढें केलेंत कीं दुःखाला प्रारंभ झालाच.

ह्मणून कर्मयोग ह्मणतो, हें आपस्वार्थीपणाचें निमित्त पुढें करण्याची संवय आधीं मोडून टाका. आणि ती आवरण्याची शक्ति तुह्मांला आली ह्मणजे ती आंत आवरून ठेवा. आणि अशा प्रकारच्या स्वार्थीपणाच्या लहरी, उठूं देण्याला मनाला मोकळीक देऊं नका. ह्मणजे तुह्मांला जगाच्या बाहेर जातां येईल. मग तुमच्यानें करवतील तितकीं कर्में करा; पाहिजे त्यांत मिसळा; तुह्मांला वाटेल तिकडे जा; तुह्मांला

कधीं वाइटाचा विटाळ किंवा संपर्क ह्मणून बाधणार नाहीं. पाण्यामध्यें कमल असतें; परंतु पाण्याच्यानें त्याला ओलें करवत नाहीं, किंवा तें त्याच्यावर ठरत नाहीं. तसें तुह्मी जगामध्यें राहाल. ह्यालाच वैराग्य किंवा कर्मयोगाची नैष्कर्म्यता किंवा अलिप्तपणा असें ह्मणतात. अलिप्तपणाशिवाय कोणताच योग होणार नाहीं, हें मीं तुह्मांस सांगितलेंच आहे, असें मला वाटतें. अलिप्तता हाच सर्व योगांचा पाया आहे. एखादा मनुष्य घरांत रहावयाचें सोडून देऊन, उत्तमोत्तम वस्त्रांचा त्याग करून, सुग्रास अन्न टाकून देऊन अरण्यांत गेला तरी, तो अतिशय अनुरक्त असूं शकेल. त्याचे केवळ भोग, त्याचें शरीर, प्रत्येक वस्तु त्याचीच होईल. आणि तो जर वांचला, तर आपल्या शरीराकरतांच जीव तोडित राहील. आह्मी बाह्य शरीराकरितां जें करूं तें विरक्त करणार नाहीं. पण त्याच्या मनांत सर्व असेल. मी आणि माझें ह्याची बंधनशृंखळा शरीराच्या आंत असते. आमच्या शरीराला आणि इंद्रियविशिष्ट ज्ञानाला जर ही

सांखळी नसेल, तर आह्मी कोठेंही व कसेही असलों तरी, आह्मी विरक्तच आहों. एखादा मनुष्य सिंहासनावर असूनही विरक्त असेल. दुसरा एखादा मनुष्य चिंध्या पांघरूनही अत्यंत अनुरक्त असूं शकेल. ही विरक्त स्थिति आपण प्रथम संपादन केली पाहिजे, आणि मग सतत कर्म करीत राहिलें पाहिजे. कर्मयोग आह्मांला अशी पद्धत सांगून देतो कीं, सर्व अनुरक्तता सोडून देण्याच्या कामांत आपणांस ती सहाय करील. आसक्ति सोडून देण्याचें काम खरोखर कठीण आहे.

सर्व आसक्ति सोडून देण्याला कर्मयोगामध्यें दोन मार्ग आहेत. जे कोणी परमेश्वरावर भरंवसा ठेवीत नाहींत, किंवा बाहेरच्या कोणत्याही सहाय्यावर ज्यांचा विश्वास नसतो, त्यांच्याकारितां एक मार्ग. त्यांनीं आपल्या कल्पना सोडून द्याव्यात आणि केवळ आपल्या इच्छेनें—आपल्या मनःशक्तीनें—मला विरक्त झालें पाहिजे असें ह्मणून केवळ स्वेच्छेनेंच कर्म करावें. तसेंच आपल्या विवेकशक्तीनें व तारतम्य ज्ञानानेंही

कर्म करावें. परमेश्वरावर ज्यांचा विश्वास आहे, त्यांना दुसरा मार्ग आहे. त्यांतून जाणें पुष्कळ सोपें आहे. ते आपल्या सर्व कर्मांचीं फळें ईश्वरामध्यें अर्पण करून कर्में करतात. परंतु फळाला कधींच आसक्त होत नाहींत. ते जें जें काय पहातात, त्यांस जें जें काय वाटतें, ते जें जें काय ऐकतात; ते जें जें काय करतात; तें तें सर्व ईश्वरार्पण करतात. आपणांस जें जें काय सत्कर्म करतां येईल, त्याच्या स्तुतीचा हक्क आमच्याकडे कांहीं नाहीं. कर्म हें परमेश्वराचें आहे. आणि त्याचीं फलें, आह्मी परमेश्वरास अर्पण केलीं पाहिजेत. आपल्या आयुष्यामध्यें अत्यंत मोठें कृत्य जरी झालें, तरी त्याचा फायदा आपण घेण्याचें मनांत सुद्धां आणूं नका. किंवा तें अमुक अमुक सत्कृत्य मीं केलें, हें सुद्धां मनांत आणूं नका. सर्व कर्म परमेश्वराचें आहे. ह्याकरितां त्यापासून अलग राहून असें मनांत आणा कीं, आमचा प्रभु जो सर्वेश्वर, त्याचे आह्मी फक्त आज्ञाधारक सेवक आहोंत. आणि प्रत्येक कृत्याची प्रेरणा प्रतिक्षणीं त्याजकडून येत आहे. "तुह्मी जी जी काय उपासना करतां, तुह्मी जें जें काय पा-

हतां, जें जें काय आचरण करतां, तें तें सर्व त्याच्याच मध्यें अर्पण करून स्वस्थ असा." आपल्याच ठिकाणीं शांत असा. परिपूर्ण शांतीचा अंगीकार करा. आणि आपलें सर्व शरीर, मन आणि प्रत्येक गोष्ट, ह्यांचा परमेश्वरामध्यें शाश्वतचा होम करून टाका. प्राचीन कालीं अग्नीमध्यें होमद्रव्यें घालून यज्ञ करीत त्यापेक्षां तुह्मी रात्रंदिवस हाच आपल्या लहानशा जीवात्म्याचाच महायज्ञ करा. "ह्या जगामध्यें संपत्ति धुंडतां धुंडतां संपत्ति काय ती तूंच मला आढळलास. ह्याकरितां मीच तुझ्यामध्यें बळी पडतों. मी प्रीतिपात्र धुंडीत होतों, पण तूंच एक प्रीतिपात्र सांपडलास. ह्मणून तुझ्यामध्यें मी आपला देह अर्पण करतों." अहर्निश हाच मंत्र जपा, आणि ह्मणा "माझ्याकरितां कांहीं नाहीं. वस्तु चांगली असो, वाईट असो, कीं कसलीही असो. तरी मला हरकत नाहीं. त्याची मी पर्वा करीत नाहीं. मी सर्वस्वी तुझ्यामध्यें देह ठेवतों." आमच्या आत्म्याला आपल्याबरोबर तसें करण्याची संवय लागेपर्यंत, तो आपल्या रक्तांत, आपल्या मेंदूंत, आपल्या

सर्व शरीरांत भिनेपर्यंत, ह्या आत्मत्यागहेतूचा क्षणोक्षणीं आज्ञाधारक सेवक वनेपर्यंत, त्याचा अहो-रात्र त्याग करा. आणि मग तुह्मी समरांगणांत जाऊन उभे रहा; तोफांच्या गडगडाटांत शिरा; कीं घनघोर युद्धांत मुसंडी द्या; तरी तुह्मी शांत आणि मुक्त आहां असेंच तुह्मांला वाटेल.

कर्मयोग आह्मांला असें शिकवितो कीं, कर्तव्याची जी साधारण कल्पना आहे, ती हलक्या प्रतीची आहे. तथापि आपण सर्वांनीं तें केलें पाहिजे. तरी आपणांस कळून येतें कीं, कर्तव्याचें विशेष ज्ञान हें नेहेमीं मोठे दुःखास कारण होतें. कर्तव्य हा आह्मांला एक रोगच होऊन राहतो. आणि तो आपणांस पुढें पुढें ओढित असतो. तो आह्मांस धरून ठेवतो, आणि सारा जन्म दुःखांत घालवितो. मनुष्यजन्माचें विष तें तें. "हें कर्तव्य, ही कर्तव्याची कल्पना, हा उन्हाळ्यांतला सूर्य असून तो मनुष्यजातीच्या आत्म्याला भाजून काढतो." विचाऱ्या गरीब गुलामांचें कर्तव्य पहा. त्यांना प्रार्थना करावयाला वेळ नाहीं, कीं स्नान करा-

वयाला वेळ नाहीं. सदान् कदा त्यांच्यावर कर्तव्याचें ओझें लादलेलें! ते बाहेर जाऊन काम करूंद्यात. मस्तकावर कर्तव्य! ते घरीं येतात आणि दुसऱ्या दिवसाच्या कामाचा विचार करीत बसतात. कारण, मस्तकावर कर्तव्य! गुलामांचा जन्म हेंच त्यांचें जीवन, आणि अखेर [भाडोत्री तांग्याचीं] तट्टें जशीं लगाम तोंडांत धरून रस्त्यांत प्राण सोडतात, त्याप्रमाणें ओझ्यानें लादून मरावयाचें! कर्तव्य ह्मणून ह्मणतात, तें हें असें असतें. तर खरें कर्तव्य ह्मणजे अलिप्त असणें, आणि सर्व कर्म परमेश्वरामध्यें अर्पण करून मुक्त असल्याप्रमाणें काम करणें हें होय. आमचीं सर्व कर्तव्यें आहेत तीं, परमेश्वराचीं आहेत. तीं करावयाला त्यानें आह्मांला आज्ञा दिली आहे, ह्यांतच आह्मांस आनंद आहे. तें आह्मी चांगलें करतों का वाईट करतों, कोणास माहिती? आह्मीं चांगलें केलें, तर त्याचें आह्मी फल घेत नाहीं; तें जर आह्मीं वाईट केलें, तरी त्याची आम्ही पर्वा बाळगीत नाहीं. शांत असा; मुक्त व्हा; आणि कर्म करा. अशा प्रकारची

मुक्ति संपादण्याचें काम कठीण आहे. गुलामगिरी म्हणजे कर्तव्य, ह्याची व्याख्या करणें किती सोपें आहे पहा! माणसांमाणसांतली कुजकी प्रीति ह्याचें नांव कर्तव्य! मनुष्यें जगामध्यें बुडी देतात, आणि त्यांचें ज्या पदार्थावर मन लागलेलें असतें, तो पैसा. किंवा दुसऱ्या कोणत्या तरी पदार्थासाठीं, झगडतात आणि यातायात करीत असतात. तुम्ही असें कां करितां ? म्हणून त्यांना विचारा. म्हणजे ते म्हणतात "तें आमचें कर्तव्य आहे." सोन्यासाठीं, मिळकतीसाठीं, लोभिष्ठपणा करणें अयुक्तिक असतें. आणि तो छपविण्याला त्याच्यावर ते थोडीशीं फुलें टाकण्याची खटपट करित असतात.

तर मग कर्तव्य म्हणजे तरी काय ? विषयवासनेची किंवा आमच्या आसक्तीची जी उसळी, तेंच खरोखर कर्तव्य. कोणतीही आसक्ति प्रगट झाली, म्हणजे तिला आम्ही कर्तव्य असें म्हणतों. उदाहरणार्थः—ज्या देशामध्यें लग्नसंबंध नाहीं, तेथें नवरा-बायकोचें कर्तव्य नाहीं. लग्नाचा संबंध आला, म्हणजे

अनुरक्त होण्यासाठीं नवराबायको एकत्र राहूं लागतात. आणि मग तें त्यांचें एकत्र राहणें, पिढ्यान् पिढ्या कायम होतें. अशा रीतीचा प्रघात पडला, कीं तें कर्तव्य झालें. म्हणून अशा प्रकारें राहणें, हा एक जुनाट रोग होय, असें म्हणावें लागतें. तो प्रखर असतो तेव्हां त्याला आम्ही रोग म्हणतों, आणि तो जुना झाला म्हणजे त्याला आम्ही धर्म म्हणतों. पण तो एक रोग खरा. म्हणून आसक्तता जुनी झाली, वहिवाटींत पडली, म्हणजे तिला आम्ही 'कर्तव्य' असें उच्च स्वराचें नांव देऊन त्याला धर्मसंस्कारांत घालतों. त्यावर आम्ही फुलें वाहतों; त्याच्या पुढें वाद्यें वाजवितों; त्याच्यावर मंगल स्तोत्रें म्हणतों आणि मग सारें जग त्याच्यासाठीं झगडूं लागतें. ह्या कर्तव्याच्या पायांत मनुष्यें एकमेकांस मनापासून लुटित सुटतात. पशुधर्माला आळा घालण्याइतकें कर्तव्य विस्तृत होईल तर तें चांगलें. दुसरा कोणताच हेतु वाळगतां येत नाहीं, अशा अगदीं हलक्या प्रतीच्या मनुष्यांना कर्तव्य हें बरेंच हितकर आहे.

परंतु जे कर्मयोगी होऊं इच्छितात, त्यांनीं कर्तव्याची ही कल्पना सुद्धां धाब्यावर बसविली पाहिजे. कर्तव्य हें तुम्हांलाही नाहीं, आणि मलाही नाहीं. तुम्हांला जगास जें जें काय द्यावयाचें, तें निखालस निरपेक्षतेनें द्या, कर्तव्य म्हणून देऊं नका. त्याच्या बद्दलचा कोणताच विचार मनांत आणूं नका. जुलमी होऊं नका. आपण जुलमी कशाकरितां व्हावें ? कोणतीही गोष्ट तुम्हीं जुलमानें केली, तर ती आसक्ति आत्मबंधनास कारण होते. आपण कर्तव्य कशाकरितां पाळावें ? प्रत्येक गोष्ट ब्रह्माच्या ठिकाणीं अर्पण करा. "ह्या प्रत्येकाला भाजून टाकणाऱ्या कर्तव्याग्नीच्या प्रचंड आणि तप्त भात्यामध्यें हा ब्रह्मार्पणाचा पेला प्या आणि सुखी व्हा." आपण केवळ परमेश्वराच्या इच्छेसाठीं काम करीत आहोंत. त्याच्या बक्षिसासाठीं किंवा शिक्षेसाठीं करीत नाहीं. तुम्हांला बक्षीस पाहिजे असेल तर, शिक्षाही सहन केली पाहिजे. शिक्षा टाळावयाची असेल, तर त्याला एकच रस्ता. तो हा कीं, बक्षिसाची आशा सोडावी.

दुःखांतून मुक्त होण्याला मार्ग हाच कीं, सुखाची कल्पना सोडून देणें. कारण, ह्या उभयतांच्या साखळीचा दुवा, अगदीं एकजीव झालेला आहे. एका बाजूला सुख असलें, तर दुसऱ्या बाजूला दुःख असतें. एका बाजूला जन्म असला, तर दुसऱ्या बाजूला मृत्यु. मृत्यूला टाळावयाचें असलें, तर जन्मावरचें प्रेम सोडावें. दोन निरनिराळ्या टोंकांवरून पाहिलें म्हणजे जन्म आणि मृत्यु हे एकरूपच आहेत. ह्याकरितां दुःखावांचून सुखाची कल्पना; किंवा मृत्यूवांचून जन्माची कल्पना; शाळेंतल्या विद्यार्थ्यांना आणि मुलांना मात्र फार उत्कृष्ट आहे. परंतु विचारी मनुष्यांस समजून येतें कीं, हे केवळ संज्ञाविपर्याय आहेत. ह्या परस्परविरुद्ध गोष्टी सोडून दिल्या पाहिजेत. तुह्मीं कोणतीही गोष्ट केली तरी, तिच्या बक्षिसाची किंवा स्तुतीची अपेक्षा धरूं नका. आह्मीं एखादें सत्कृत्य केलें न केलें, तोंच त्याच्या मान्यतेच्या इच्छेला प्रारंभ करतों. थोड्याशा पैशाचा आह्मीं धर्म केला न केला, तोंच आमचीं नांवें आह्मांला

वर्तमानपत्रांत झळकावयाला पाहिजेत. अशा इच्छांच्या परिणामाला दुःख हें असलेंच पाहिजे. जगांतील अनेक अत्यंत श्रेष्ठ पुरुष ह्यांतूनही पार पडून गेले आहेत. अशा प्रकारें जगाला माहितही नाहींत, असे जे श्रेष्ठतम पुरुष होऊन गेले, त्यांच्या तुलनेनें पाहिलें तर, आह्मांस माहित असलेले बुद्ध आणि ख्रिस्त हेही खालच्या प्रतीचेच दिग्विजयी होत. असे शेंकडो दिग्विजयी पुरुष प्रत्येक देशामध्यें बिनबोभाट कर्म करित असतात. ते मुकाट्यानेंच राहतात, आणि मुकाट्यानेंच मुक्त होतात. आणि प्रसंगानुसार त्यांचे विचार बुद्धामध्यें व ख्रिस्तामध्यें ठसलेले दृष्टीस पडतात, आणि हे मागचे शिळे विचार आम्हांस कळतात. श्रेष्ठतम मनुष्य असतात ते, आपल्या ज्ञानाच्या योगेंकरून कोणत्याही प्रकारच्या नांवाची किंवा कीर्ति मिळविण्याची अपेक्षा करीत नाहींत. ते आपले विचार जगाला अर्पण करतात. ते आपल्याला पुढें येण्यासाठीं कांहींच करीत नाहींत. ते शाळा घालून कोणाला शिकवित बसत नाहींत, किंवा आपल्या

नांवासाठीं एखादा पंथही स्थापन करीत नाहींत. अशा गोष्टीपासून त्यांचा स्वभाव संकोच पावतो. ते शुद्ध सात्विक असतात. त्यांना हालचाल करतां येत नाहीं. तर ते भक्तीमध्येंच तल्लीन होऊन राहतात. अशा प्रकारचा एक योगी हिंदुस्थानांतील एका गुहेंत राहत असलेला मीं पाहिला आहे. मीं जितके जितके पुरुष पाहिले, त्यांमध्यें तो अतिशयच लोकोत्तर आहे. त्यानें आपल्या देहाचें ज्ञान इतकें कमी केलें आहे कीं, त्यांतील मनुष्य म्हणून नाहींसाच झाला आहे, आणि सारा ईश्वरी अंशच त्यांत भरून राहिला आहे, असें मी म्हणतों. एखाद्या पशूनें त्याचा हात चावला, तर तो दुसरा हात त्याला द्यावयाला तत्पर असतो. आणि म्हणतो कीं " ही परमेश्वराची इच्छा आहे. " जी जी गोष्ट म्हणून त्याच्यावर पडते, ती ती ईश्वराकडून येते. तो मनुष्यांच्या दृष्टी पडत नाहीं, तरी तो मोठा भक्तिमान् आहे. आणि त्याचे विचार सत्य व गोड आहेत.

ह्याच्या खालच्या प्रतीचे लोक अधिक राजस किं-

वा चपल–म्हणजे यातायात करणाऱ्या स्वभावाचे. हे पूर्णतेप्रत पोंचल्यापूर्वी, कोणाचे तरी विचार घेऊन जगाला उपदेश करीत राहतात. अत्युच्च वर्गांतील पुरुष, सत्य आणि थोर कल्पना मुकाट्यानें गोळा करतात. आणि दुसरे बौद्धधर्मी आणि ख्रिस्तधर्मी लोक ठिकठिकाणीं जाऊन त्यांचा उपदेश करतात, व त्यांचा प्रसार करतात. **गौतम बुद्धाच्या** चरित्रामध्यें बुद्ध हा पंचविसावा बुद्ध होता, असें पुन्हा पुन्हा म्हटलेलें दृष्टीस पडतें. त्याच्या पूर्वीं चोवीस होऊन गेलेले बुद्ध बुद्धालाही माहित होते. व त्यांच्यावरच हें विधान केलेलें आहे. तरी इतिहासांत ते कोठेंच आढळून येत नाहींत. महात्मे पुरुष शांत, स्तब्ध आणि अज्ञात असतात. विचाराचें खरें सामर्थ्य जाणणारे काय ते तेच पुरुष होत. त्यांची खात्री असते कीं, आपण एखाद्या गुहेंत जाऊन बसलों आणि दार बंद करून घेऊन केवळ पांचच जरी, सत्य विचार मनांत आणले, आणि मग सोडून दिले, तरी हे आपल्या इच्छेचे पांच विचार चिरंजीव होऊन

राहतील. असले विचार खरोखर, पर्वत उल्लंघून जातील; समुद्रांतून पार पडतील; आणि जगभर प्रवास करून मनुष्यांच्या अंतःकरणांत, मेंदूंत, खोल प्रवेश करून स्त्रियांना आणि पुरुषांना जागृत करतील. ते मनुष्यजन्माच्या कर्मामध्यें त्यांना व्यवहारचातुर्य देतील. हे सात्विक पुरुष येथें—पृथ्वीवर—मनुष्यजातीला जसे सांगतात तसेच ते उद्योगशीलतेंत, टक्कर देण्यांत, कर्म करण्यांत, व लोकांचें हित करण्यांत, ईश्वराच्या अगदीं जवळ जवळ असतात. राजस—किंवा उद्योगी लोक चांगले असले तरी, त्यांच्यामध्यें थोडासा अज्ञानाचा भाग शिल्लक राहिलेला असतो. आमच्या स्वभावानें जरी आपल्यामध्यें कांहीं मलीनता शिल्लक ठेविली, तरी आम्हांला एकट्यालाही कर्म करतां येतें. कर्माचा स्वभावधर्मच असा आहे कीं, आसक्तीनें, व सामर्थ्यानेंच, त्यानें नेहेमीं प्रवृत्त व्हावें. रात्रंदिवस चंदनाप्रमाणें आंग झिजविणाऱ्या महात्म्यापुढें, आणि चिमणीचें पडणें सुद्धां जो पहातो, त्या ईश्वरापुढें, मनुष्याला आपल्या स्वतःच्या कामांची प्रतिष्ठा ती.

वाटणार कशी? जगांतील अत्यंत सूक्ष्म वस्तूचीही काळजी घेण्यांत तो तत्पर असलेला आम्हांस माहित असून आम्ही जर तसें करूं, तर ती ईश्वराची निंदा केल्याप्रमाणें होणार नाहीं काय? आम्ही त्याच्या पुढें त्याचा धाक बाळगून व पूज्यबुद्धि ठेवून उभे राहूं, आणि येवढेंच म्हणूं कीं, सर्व कर्ता करविता तूंच आहेस. अत्यंत श्रेष्ठ मनुष्यांना कर्म करवत नाहीं. कारण, त्यांना आसक्ति नसते. "ज्यांचा संपूर्ण आत्मा, परमात्म्यामध्यें लीन झाला, ज्यांच्या इच्छा आत्मस्वरूपांत लय पावल्या, जो परमात्म्याशीं सरूपता पावला, त्याला कर्माची गरज नाहीं." असे पुरुष खरोखर मनुष्यजातीमध्यें अत्यंत श्रेष्ठ होत. परंतु त्याहून निराळा जो कोणी असेल, त्यानें कर्म केलें पाहिजे. आणि तें करतांना आह्मीं असें कधींही मनांत आणूं नये कीं, ह्या विश्वांतील क्षुल्लक वस्तूलाही आह्मांला सहाय्य करण्याचें सामर्थ्य आहे. आमच्यानें कांहींच करवत नाहीं. ह्या जगांतल्या तालमीमध्यें केवळ आपण आपल्यालाच सहाय करतों.

हेंच कर्मयोगाचें खरें स्वरूप होय. ह्या रीतीनें आह्मी जर कर्म करूं लागलों; आह्मीं जर नेहेमीं स्मरण ठेवलें, कीं आमचा हा काम करण्याचा विद्यमान प्रसंग अशा प्रकारें आह्मांला आणून दिलेला आमचा हक्कच आहे, तर आह्मी कशालाच लिप्त होणार नाहीं. माझ्यासारख्या आणि आपल्या सारख्या लक्षावधी लोकांस असें वाटतें कीं, ह्या जगामध्यें आह्मीच काय ते थोर आहोंत. परंतु आह्मी सर्व मरून जाऊं आणि पांच मिनिटांच्या आंतच, जग आमची ओळख विसरेल. परंतु परमेश्वर चिरायु आहे. हा सर्व शक्तिमान् सर्वेश्वर जर प्रेरणा न करील, तर एक क्षण तरी वांचणार कोण? आणि क्षणभर श्वासोच्छ्वास तरी कोण करणार? तो परमेश्वर सततोद्योगी आहे. सर्व शक्ति त्याची आणि त्याच्या आज्ञेंतली. त्याच्याच आज्ञेनें वारा वाहतो; त्याच्याच आज्ञेनें सूर्य प्रकाशतो; त्याच्याच आज्ञेनें पृथ्वी चालते; आणि त्याच्याच आज्ञेनें जगावर मृत्यु छाती काढून चालतो. तो सर्वव्यापी आहे. तो विश्वस्वरूप असून विश्वांतरात्मा

आहे. आह्मांला फक्त त्याची उपासना करतां येतें. कर्मांच्या सर्व फळांचा त्याग करा; त्याच्याच करतां सत्कृत्य करा; ह्मणजे आपोआपच परिपूर्ण अलिप्तता प्राप्त होईल. ह्याच रीतीनें अंतःकरणाचें बंधन तुटेल आणि आह्मी परिपूर्ण मुक्तीला पात्र होऊं. अशा प्रकारची मुक्ति, हीच कर्मयोगाची खरी फलश्रुति होय.

---

# भाग आठवा.

## कर्मयोगाचा उद्देश.

वैदिक धर्मांतील अत्यंत विशाल कल्पना ह्मटली ह्मणजे, ही कीं, आह्मी भिन्न भिन्न मार्गांनीं गेलों तरी, आह्मांला एकाच ठिकाणीं पोंचतां येतें. हे चार मार्ग मीं चार प्रकारांनीं कथन केलेले आहेत. ते असेः—कर्म, भक्ति, मानसशास्त्र ( राजयोग ) आणि ज्ञान.

परंतु ह्या वेळीं आपण ही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, हे चारही भेद परस्परांपासून अगदीं भिन्न व वेगळेवेगळे नव्हेत. तर, प्रत्येक मार्ग दुसऱ्याशीं एकरूपच होतो. परंतु प्रचारांत त्यांचीं लक्षणें समजावींत ह्मणून विभागत्वेंकरून त्यांचीं नांवें सांगितलीं. कर्मापेक्षां दुसरें सामर्थ्यच ज्यांना नाहीं, असे लोकही आपणांस आढळत नाहींत असें नाहीं. किंवा भक्तीहून अधिक ज्यांना दुसरें कांहीं नाहीं, असे लोक आढळणार नाहींत असें नाहीं; किंवा केवळ ज्ञानावांचून दुसरें जगांत कांहींच थोर नाहीं, असेही लोक आढळणार नाहींत असें नाहीं. मनुष्यामध्यें असलेले धर्म जे प्रचारांत आढळतात, त्यांस अनुसरूनच हे विभाग केलेले आहेत. आपणांस आढळून येतें कीं, अखेरीस हे चारही रस्ते एके ठिकाणीं मिळून त्यांचा एकच रस्ता होतो. सारे धर्म, साऱ्या कर्मप्रवृत्ति आणि भक्ति हीं आपणांस एकाच ठिकाणीं आणि एकाच पदाला नेऊन पोंचवितात.

हें पद कोणतें तें मीं पूर्वीं सांगण्याचा प्रयत्न के-

लाच आहे. माझ्या समजुतीप्रमाणें तें पद ह्मणजे मुक्ति होय. आमच्या सभोंवार आह्मांला ज्या ज्या वस्तु दृष्टीस पडतात, त्यांपैकीं प्रत्येक वस्तु–सूक्ष्म परमाणूपासून तों मनुष्यापर्यंत, ज्ञानहीन, निर्जीव जड पदार्थापासून तों पृथ्वीवरील अति उच्च तत्त्व जें मनुष्याचा आत्मा, त्याच्यापर्यंत–मुक्त होण्याकरितां धडपडत असते. ह्या सर्व ब्रह्मांडाच्या खटपटीचा परिणाम मुक्तता प्राप्त करून घेणें हाच आहे. दरोवस्त संमीलनांतील प्रत्येक परमाणु दुसऱ्या परमाणूंतून निघून आपल्या स्वेच्छ मार्गानें जाण्याचा यत्न करित असतो. पण दुसरे त्याला अटकाव करून धरून ठेवित असतात. आमची पृथ्वी, सूर्याच्या तावडींतून सुटून जाण्याचा यत्न करीत आहे. आणि चंद्र, पृथ्वीपासून सुटका करून घेण्याच्या खटपटींत आहे. प्रत्येक वस्तूच्या आंगीं विभक्त होण्याचा अपरंपार धर्म आहे. ह्या ब्रह्मांडामध्यें जें काय सारें आह्मी पाहतों, त्याच्या मध्यें, मुक्ततेकरितां झटणें हा एक पाया असलेला दृष्टीस पडतो. साधु प्रार्थना

करितात, आणि चोर चोरी करतात, ते ह्याच धर्माच्या जोरानें. कर्म करण्याची ग्रहण केलेली दिशा, यथायोग्य नसली, ह्मणजे तिला आह्मी वाईट असें ह्मणतों. आणि तिचें स्वरूप यथायोग्य व थोर असलें ह्मणजे त्यास आपण चांगलें असें ह्मणतों. दोहोंमध्यें उद्देश एकच–मुक्ततेकारितां खटपट. साधु हा आपल्या बंधनाच्या स्थितीच्या ज्ञानाच्या अमलाखालीं असतो, आणि त्यांतून त्याला मुक्त व्हावयाचें असतें, ह्मणून तो परमेश्वराची आराधना करतो. चोर, आपल्याला फलाणी फलाणी वस्तु मिळत नाहीं, ह्या काळजीनें बेजार झालेला असतो, आणि त्या अडचणींतून मुक्तता व्हावी ह्मणून चोरी करतो. ज्ञानी असो कीं अज्ञानी असो. सृष्ट धर्माचा हेतु एक मुक्ति. आणखी कळून ह्मणा किंवा नकळून ह्मणा, प्रत्येक पदार्थ त्याच उद्देशानें झप्या खात असतो. साधूनें मुक्ति मिळविण्यांत व चोरानें मुक्ति मिळविण्यांत फार अंतर असतें. साधूची मुक्ततेवर खरी भक्ति असते, आणि ती त्याला अनिर्वाच्य व अप-

रंपार आनंद भोगावयास देते. आणि चोर, जिच्या-वर आपला जीव ठेवतो, ती त्याच्या आत्म्याला दुसरें एक बंधन मात्र आणून देते.

हें मुक्तीकडे जाण्यासाठीं चाललेल्या झगड्याचें स्व-रूप प्रत्येक धर्मामध्यें आढळून येतें. सर्व नीतीचा आणि स्वार्थत्यागाचा पाया हाच आहे. त्याच्या यो-गानें मनुष्यें हीं आपल्याच क्षुद्र शरीरासारखीं आहेत, अशी जी कल्पना तिच्यापासून मुक्तता मिळते. आ-पण एखादा मनुष्य जेव्हां सत्कर्म करतांना पाहतों, दुसऱ्यास सहाय करतांना पाहतों, तेव्हां त्याचा अर्थ हा कीं 'मी' आणि 'माझें' या मर्यादित मंडळाच्या ह-द्दींत तो अडकून राहत नाहीं. ह्या स्वार्थीपणांतून बाहेर पडण्याला कांहीं बंध नाहीं. नीतिशास्त्रांतील मो-ठमोठाले पंथ, ह्याच हेतूला अनुलक्षून पूर्णपणें स्वार्थ-त्यागाचाच उपदेश करतात. कल्पना करूं कीं, हा स्वार्थत्याग एखाद्या मनुष्याला प्राप्त झाला, तर त्या मनुष्याचें काय होतें? मग त्या पुढें तो फलाणा फला-णा-गृहस्थ-हें नातें उरत नाहीं. तो अमर्याद पसरलेला

असतो. तो अनंतस्वरूप बनतो. त्याचें पूर्वीं असलेलें लहानसें—मनुष्यपण—व्यक्तित्व—मुळीं नाहींसेंच होऊन जातें. तो अनंत होतो. आणि असें अनंतत्व प्राप्त होणें हेंच काय तें सर्व धर्मांचें, सर्व नीतींचें, आणि शास्त्राभ्यासाचें, फल आहे. ही गोष्ट शास्त्रीयरीत्या सिद्ध झालेली, एखाद्या देहात्मवाद्यानें ऐकिली, कीं त्याचें धाबें दणाणून जातें. पण त्याच वेळीं तो जर नीतिशास्त्र शिकवूं लागला, तर तो शेवटीं स्वतः सुद्धां तीच कल्पना सांगतो. मनुष्याच्या स्वार्थत्यागीपणाला तो प्रतिबंध करीत नाहीं. आतां कल्पना करा कीं, देहात्मवादपद्धतीनें एकादा मनुष्य पूर्ण स्वार्थत्यागी बनला, तर त्याला दुसऱ्या पंथानें परिपूर्ण झालेल्यापासून निराळा कसा ओळखावा? तो विश्वाशीं एकरूप होऊन राहतो. आणि व्हावा हाच सर्वांचा उद्देश. इतकेंच कीं, त्या बिचाऱ्या देहात्मवाद्याला आपल्याच विचारानें त्यास अनुसरून अखेरपर्यंत पल्ला पोंचविण्याचें धैर्य नसतें. सर्व मानवी स्वभावाची इतिकर्तव्यता जी मुक्ति, ती कर्मयोगानें प्राप्त होते. म्हणून प्रत्येक स्वार्थी कर्म, आ-

मच्या मुक्कामास जाण्याला अडथळा करतें; आणि प्रत्येक स्वार्थत्यागी कर्म, आह्मांला आमच्या मुक्कामास नेऊन पोंचवितें. ह्याच कारणाकरितां, नीतिशास्त्राची व्याख्या करणें तर इतकीच करतां येते कीं:—

" स्वार्थी ह्मणून जेवढें जेवढें, तेवढें तेवढें अनीतीचें; आणि स्वार्थत्यागी ह्मणून जेवढें जेवढें, तेवढें तेवढें नीतीचें होय. "

परंतु तुह्मी त्याची अधिक फोड करूं लागाल, तर मात्र ती गोष्ट तितकी सोपी आहे असें दिसणार नाहीं. उदाहरणार्थ, मीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें आपल्या भोंवतालचा समाज, त्याचे पोटभेद अगदीं भिन्न भिन्न करून सोडतो. एका समाजांतील एक कृत्य स्वार्थत्यागाचें होईल, आणि तेंच कृत्य दुसऱ्या समाजामध्यें निखालस स्वार्थाचें ठरेल. ह्मणून आह्मांला अशी सर्वसाधारण व्याख्या करावी लागते. आणि त्याचे पोटभेद, निरनिराळे समाज, प्रसंग व देश ह्यांजवरच सोंपवावे लागतात. एका देशामध्यें एक जातीची चाल नीतीची ह्मणून समजतात, आणि

तीच चाल दुसऱ्या देशामध्यें अनीतीची ह्मणून समजतात. कारण, समाज व चाल वेगवेगळीं पडलीं. सर्व स्वभावधर्मांचा हेतु मुक्तता. आणि मुक्तता प्राप्त होते निखालस स्वार्थत्यागीपणानें. प्रत्येक कर्म, विचार, शब्द आणि कार्य, जें जें ह्मणून स्वार्थविरहित असतें तें आह्मांला त्याच पदाला पोंचवितें. आणि अशालाच नीति असें ह्मणतात. प्रत्येक धर्मामध्यें आणि प्रत्येक नैतिक पंथामध्यें, हीच व्याख्या चांगली मानल्याचें आपणास दिसून येईल. कित्येक पंथांमध्यें नीति ही, **पुरुषोत्तम** असा जो परमेश्वर त्याच्यापासूनच उत्पन्न झालेली आहे असें मानतात. आपण जर विचारलें कीं, एखाद्या मनुष्यानें हेंच कां करावें ? तें कां करूं नये ? तर त्याचें उत्तर हें:–" कारण, परमेश्वराची तशी आज्ञा आहे. " पण जेथून जेथून ही मूळ कल्पना निघते, तेथें तेथें नीतीच्या नियमांत सुद्धां एक व्यापक कल्पना असते. ती ही कीं, आपणांविषयीं विचार करावयाचा नाहीं, तर तो टाकून द्यावयाचा. तथापि कांहीं लोक, ह्या नीतितत्वाच्या

श्रेष्ठ व व्यापक तत्त्वाला न जुमानतां, आपलें लहानसें व्यक्तित्व सोडून देण्याचा विचार ऐकून घाबरतात. ह्या क्षुल्लक व्यक्तित्वाच्या कल्पनेला जो मनुष्य चिकटून राहिलेला असतो, त्याला आपणास असें विचारतां येईल कीं, जो मनुष्य पूर्ण स्वार्थत्यागी आहे, ज्याला स्वतःचा ह्मणून मुळींच विचार नाहीं, जो स्वतःकरितां ह्मणून कोणतेंच कृत्य करीत नाहीं, जो स्वतः-करितां कोणताही शब्द बोलत नाहीं, त्या मनुष्याला 'स्वतः' हा शब्द तरी राहिला कोठें? तें सांगा. तो जेथपर्यंत 'मी' हा विचार करीत आहे, आपल्या-करितांच कृत्य करीत आहे, आपल्याकरितांच बोलतो आहे; तावत्कालपर्यंत काय तें 'मी' असतें. तो इतरां-विषयीं, जगाविषयीं आणि सर्वांविषयींच विचार करूं लागला, तर मग त्याचा 'मी' तो कोठें राहिला? गेला, तो पार निघून गेला.

ह्मणून सत्कर्म आणि स्वार्थत्याग ह्यांच्या द्वारें मुक्ति मिळविण्यासाठीं कर्मयोग ही नैतिक आणि धार्मिक पद्धत, ठरवून ठेवलेली आहे. कर्मयोग्याला को-

णत्याही विशेष मतावर विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाहीं. त्याचा परमेश्वरावर जरी भरंवसा नसला, तरी सुद्धां चालेल. त्याला आपला आत्मा ह्मणजे काय, ह्याचा विचार करावयाला नको; किंवा अध्यात्मज्ञानामध्यें डोकेंही खर्च करावयाला नको. अहंकारांतून सुटका करून घेणें, हा विशेष हेतु धरून असल्यामुळें, तो अहंकार सोडूनच कर्म करित असतो. त्याचा प्रत्येक क्षण कर्म करीत असतो. कारण, त्याला कर्मानेंच मुक्त व्हावयाचें असतें. कोणत्याही आरंभाशिवाय, कोणत्याही पंथाशिवाय, ज्ञानी जें आपल्या विचारानें आणि ईश्वरी प्रेरणेनें सोडवितात, भक्त जें आपल्या निस्सीम भक्तीनें सोडवितात, तें कोडें त्यांस कर्मानेंच सोडवावयाचें असतें.

आतां दुसरा प्रश्न असा येतो कीं, कर्म हें काय आहे? जगाचें चांगलें करणें ह्मणजे काय? आह्मांला जगाचें हित करतां येईल काय? निरपेक्ष बुद्धीनें उत्तर देणें तर "नाहीं." आणि सापेक्ष बुद्धीनें उत्तर देणें तर "होय." जगाचें चिरंतन किंवा कधीं नाश न पावेल

असें कल्याण करतां येणें अशक्य आहे. आणि जर करतां येईल, तर हें तें जग असणार नाहीं. भुकेलेल्या मनुष्याला पांच मिनिटें आपणांस तृप्त करतां येईल. पण त्याला पुन्हा भूक लागावयाची ती लागेलच. जी जी तृप्ति ह्मणून आपण दुसऱ्यास देतों, ती ती सारी क्षणिक असल्याचें दिसून येतें. सदासर्वदा सुखदुःखाचा भरलेला ताप अक्षयी घालविण्याला कोणीही समर्थ नाहीं. जगाला अक्षय सुख कोणाला तरी देतां येईल काय ? दुसरा कोठें तरी खळगा झाल्यावांचून समुद्रांतील लाट उचलावयाची नाहीं. मनुष्याची गरज आणि लोभ, ह्याच्या प्रमाणानें जगामध्यें चांगल्या वस्तूंची गोळा बेरीज ठरलेली आहे. ती वाढवितां येणार नाहीं, व कमीही करतां येणार नाहीं. आज मितीस जो कांहीं उपलब्ध आहे, तेवढा मनुष्यजातीचा इतिहास पहा. तींच सुख दुःखें; तीच हर्ष शोक; त्यांच्यांतील भेदही तितकाच; ही गोष्ट आपल्या दृष्टीस पडत नाहीं काय? कांहीं श्रीमंत कांहीं गरीब; कांहीं उंच कांहीं नीच; कांहीं सशक्त कांहीं अशक्त;

असेच नाहींत काय? हें सर्व जसें आज अमेरिकें-तील लोकांना लागू आहे, तसेंच तें इजिप्शियन, ग्रीक, रोमन इत्यादि लोकांनाही प्राचीन काळीं लागू होतें. इतिहासाचा जेथपर्यंत शोध आहे, तेथपर्यंत ह्या सर्व गोष्टी एकसारख्याच घडत आलेल्या आहेत. तथापि, त्याच वेळीं आपणांस एक दिसून येतें कीं, सुखदुःखाच्या ह्या साऱ्या अपरिहार्य भेदासहवर्तमान धांवतांना तीं हलकीं करण्याकरितां, सारखा प्रयत्न चालू असतो. इतिहासाच्या कोणत्याही कालांत, दुस-ऱ्याकरितां आपल्या आयुर्भागांत जिवापाड किंवा थोडे बहुत तरी परिश्रम केलेलीं अशीं हजारों स्त्रीपु-रुषें जन्मल्याचें नमूद केलेलें आहे. पण त्यांत त्यांना कितीसें यश आलें? आह्मी फक्त हिकडून तिकडे चेंडू फेंकून खेळत असतों. आपण शारीरिक क्षेत्रां-तून दुःखास हांकलून लावलें, तर तें मनामध्यें ठाणें देतें. दांते* कवीच्या 'पाताल' काव्यांत–कृपणांस

---

* हा अतिप्रसिद्ध इटालियन कवि फ्लारेन्स शहरीं होऊन गेला. ह्याचा जन्म इ० स० १२६५ व मृत्यु इ० स० १३२१.

एक सोन्याचा चेंडू देऊन तो एका टेकडीवर चढवावयाला सांगितला होता—तद्वत्च ही गोष्ट होय. ते प्रत्येक खेपेस त्याला थोडा वर लोटीत, आणि तो पुन्हा खालीं येत असे. एवंच सुखात्मक सहस्र वर्षांचें आनंदयुग होणार, हीं भाषणें शाळेंतील मुलांना गोष्टी सांगावयाला फार छान आहेत. पण त्यांची योग्यता ह्याहून कांहीं विशेष नाहीं. जीं सारीं राष्ट्रें आनंदयुगाच्या मनोराज्यांत डुंबत असतात, त्यांस सुद्धां, जगांतील सर्व लोकांविषयीं असें वाटतें कीं, ते सुद्धां उत्तरोत्तर अधिकाधिकच सुधरत जातील. ही आनंदयुगांतील स्वार्थत्यागाची कल्पना विचित्रच खरी!

ह्या जगाच्या सुखामध्यें आपल्याला कांहीं भर घालतां येत नाहीं. त्याचप्रमाणें त्याच्या दुःखांतही पण घालतां येत नाहीं. ह्या पृथ्वीवर नेमलेलें जें सुखदुःखाचें प्रमाण, तें जिकडे तिकडे सारखेंच रहावयाचें. आह्मी ह्या बाजूनें हाकून लावलें, तर तें त्या बाजूला जाईल. आणि त्या बाजूनें हुसकून दिलें ह्मणजे ह्या

वाजूला येईल. पण तें जितकें असावयाचें तितकेंच असेल. कारण, तें जेवढेंच्या तेवढें राहणें, हाच काय तो सृष्टीचा नित्यनियम आहे. ही भरती आणि आहोटी; चढ आणि उतार, हा जगाच्या सिद्ध स्वभावांतच आहे. आणि तर्कशास्त्राप्रमाणें तो तसाच असला पाहिजे, नाहीं तर आह्मांला मृत्यूवांचून जन्म होईल असें ह्मणावें लागेल. हें निखालस अज्ञान आहे. कारण, जन्माची कल्पना मनांत आणली कीं, तत्काल मृत्यु पुढें येतो. आणि सुखाची कल्पना मनांत आणली कीं, दुःख पुढें उभें राहतें. दिवा जर एकसारखा सतत राहिला, तर तेंच त्याचें आयुष्य होईल. तुह्मांला जन्म पाहिजे असेल, तर त्याच्या साठीं प्रतिक्षणीं मेलें पाहिजे. जन्म आणि मृत्यु, हीं दोन निरनिराळ्या टोंकांवरून पाहिलेलीं दोन आंगें आहेत. ते एकाच लाटेचे चढ आणि उतार आहेत. आणि ते दोन आकार मिळून एक सबंध वस्तु आहे. जो कोणी पडत्या बाजूकडून पाहतो, तो तिरस्कारी बनतो. दुसरा चढत्या बाजूकडून पाहतो तो, प्रेमळ बनतो.

एखादा मुलगा शाळेंत जात असला, आईबापें त्याला जपत असलीं, तर त्याला प्रत्येक वस्तु आनंददायकच वाटते. ज्याच्या गरजा अगदीं क्षुल्लक असतात, तो मोठा प्रेमळ होय. परंतु एखादा म्हातारा मनुष्य अनेक प्रकारचे अनुभव घेऊन शांत स्थितीला पोंचतो, आणि त्याच्या साऱ्या उसळ्या थंडगार होऊन स्थीरतेला पोंचलेल्या असतात. त्याचप्रमाणें जुन्या राष्ट्रांना, त्यांच्या सभोंवार ऱ्हासांच्या चिन्हांचा पाळा पडलेला असल्यामुळें, नव्या राष्ट्रांपेक्षां त्यांची आशा कमी असणें साहजिकच आहे. हिंदुस्थानामध्यें एक म्हण आहे "हजार वर्षें शहर आणि हजार वर्षें अरण्य." शहराचें अरण्य व्हावें, आणि अरण्याचें शहर व्हावें, हें जिकडे तिकडे चालावयाचेंच. आणि लोक, ज्या बाजूकडून त्याच्याकडे पहातात त्याप्रमाणें ते त्रासिक किंवा संतोषी बनतात.

दुसरी आह्मी कल्पना घेतों अशी ह्मटली ह्मणजे साम्याची. ह्या आनंदमय कल्पनांच्या आंगीं कर्म करण्याला शक्ति देण्याचें मोठें सामर्थ्य आहे. पुष्कळ धर्म

तर, त्यांच्यांत हें एक तत्त्वच असल्याप्रमाणें उपदेश करतात कीं, परमेश्वर जगावर अंमल करावयास येईल आणि त्या वेळेस कोणामध्येंच भेदभाव ह्मणून रहाणार नाहीं. दरिद्री व श्रीमंत; सुखी व दुःखी असें कांहींच राहाणार नाहीं. सारे एकसारखे सुखीच होतील. असें मत प्रतिपादन करणारे लोक, शुद्ध देवभोळे होत. आणि देवभोळे लोक हे, खरोखर मनुष्यजातीपैकीं अत्यंत सात्विक असतात. ख्रिस्ती धर्म हा अशाच देवभोळेपणाच्या मुळीच्या पायावर प्रतिपादन केला गेला. आणि ह्मणूनच तो ग्रीक व रोमन लोकांच्या गुलामांस आवडला. त्यांना असें वाटलें कीं, ह्या सर्वमान्य धर्मामध्यें गुलामगिरी असणार नाहीं. कारण, त्यांत खाण्याची आणि पिण्याची खूप चैन असणार. ह्मणून ते ख्रिस्ती धर्माच्या कळपांत शिरले. ह्या कल्पनेचा प्रथम ज्यांनीं उपदेश केला, ते देवभोळे लोक खरोखर अडाणी होते. परंतु अत्यंत निष्कपटी असत. अर्वाचीन कालांत ह्या साम्यधर्मालाच साम्यता, स्वातंत्र्य, आणि बंधुप्रीति असें स्वरूप आलें आहे. पण हा

सुद्धां देवभोळेपणाच. खरी साम्यता कधींच झालेली नाहीं; आणि ती पृथ्वीवर होणारही पण नाहीं. आह्मी सर्व लोक येथें समान धर्माचे होणार कसे? अशा प्रकारची समानता असंभाव्य होय, व तिची कल्पना ह्मणजे शुद्ध मरण. भेदाभेद नाहींसा झाला ह्मणजे जग तें काय, आणि करणार तें काय? आद्य-स्थिति–जिला भूतसंकर असें ह्मणतात, ती प्राप्त होते, तेव्हांच बरोबर समानता होते. तर मग ह्या साऱ्या ब्रह्मांडांच्या घटनाशक्ति आल्या कोठून? झगडा, चढाओढ आणि हमरीतुमरीनें. कल्पना करा; जड पदार्थांचे सारे परमाणू एका समान धर्मानें धरले गेले तर तेथें कोणतें तरी उत्पत्तिकार्य घडेल काय? शास्त्रावरून तर आपल्यास माहित आहे कीं, ही गोष्ट अशक्य आहे. आपण एका भांड्यांतलें पाणी हालवावें, ह्मणजे आपणांस कळून येतें कीं, पाण्याचा प्रत्येक परमाणु, दुसऱ्या परमाणूला बाहेर ढकलून पुन्हां स्थिर होण्याला प्रयत्न करित असतो. अशाच रीतीचे सर्व चमत्कार ज्याला आह्मी ब्रह्मांड असें

ह्मणतों–त्यांतील सर्व वस्तु पुनरपि आपणांला समान स्थिति प्राप्त व्हावी ह्मणून झगडत असतात. फिरून अदलावदल होते; पुन्हा आम्ही एकरूप होतों; पुन्हा उत्पत्ति होऊन असमानता होते. हाच सृष्ट्युत्पत्तीचा पाया आहे. त्याच वेळीं समानता येण्यासाठीं, शक्तींची झुंज लागते. त्यांची, उत्पत्तीला जितकी जरूरी आहे, तितकीच संहारालाही आहे.

परिपूर्ण समानता म्हणंजे, साऱ्या पातळींतील सर्व शक्तींच्या झगड्यांची साम्यता. अशी साम्यता ह्या जगांत कधीं होणें शक्यच नाहीं. ती स्थिति आपणांस प्राप्त होण्यापूर्वीं हें जग कोणत्याच जन्माला निरुपयोगी असें होईल. त्यावर कोणीच असणार नाहीं. ह्मणून आपणांस दिसून येतें कीं, ह्या सर्वसुखात्मक कालाच्या व परिपूर्ण समानतेच्या कल्पना असंभाव्य आहेत. इतकेंच नव्हे, तर त्यांच्याविषयीं आह्मी खटपट करूं लागलों तर, त्या आह्मांला कल्पांताचे दिवस मात्र दाखवितील. माणसामाणसांतील भेदानें काय होतें ? हा भेद ह्मटला ह्मणजे

मुख्यत्वेंकरून मेंदूमध्यें असतो. आजकाल विक्षिप्त मनुष्याशिवाय, दुसरा कोणताच मनुष्य असें ह्मणणार नाहीं कीं, आह्मी सारे मेंदूच्या सारख्या सामर्थ्याचेच निपजलों आहोंत. आह्मी जगामध्यें आलों आहोंत ते, असमान धर्माला घेऊन आलों आहोंत. आह्मी मोठे मनुष्य किंवा हलके मनुष्य होऊन येतों. आणि पूर्वजन्मार्जिताप्रमाणें, जी स्थिति आमच्या वांट्यास आलेली असते, ती आह्मांस सुटत नाहीं. अमेरिकन इंडियन् लोक ह्या देशांत हजारों वर्षें होते. आणि तुमचे मूठभर पूर्वज त्यांच्या प्रदेशांत आले. त्यांनीं देशाच्या शोभेंत कसा फेरफार केला ? सारेच जर समान आहेत, तर मग त्या इंडियन् लोकांनींच सुधारणा करून शहरें कां वसविलीं नाहींत ? तुमच्या पूर्वजांबरोबर मेंदूची एक निराळीच शक्ति ह्या प्रदेशांत आली. पूर्वसंचिताचा निराळाच पुंज येथें येऊन पडला. त्यांनीं कर्म केलें, आणि तें स्वतः उदयास आलें. भिन्नत्व मुळींच नसणें ह्मणजे मृत्यु. जग आहे तावत्कालपर्यंत हा भेद असावयाचाच, आणि असलाच पाहिजे.

सुखात्मक काल आणि समानधर्म हे, उत्पत्तीच्या लयाच्या वेळीं—ह्मणजे कल्पांतानंतर मात्र येतील. त्यापूर्वी साम्यधर्म होणार नाहीं. तथापि, सर्वसुखात्मक कालाच्या ह्या कल्पनेच्या आंगीं एक अद्भुत शक्ति आहे. उत्पत्तीला ज्याप्रमाणें असमानताही अवश्य आहे, त्याप्रमाणेंच तिला मर्यादेंत ठेवण्याला झगडाही कारणभूत आहे. मुक्त होऊन परत ईश्वराकडे जाण्याला जर झगडा नसेल तर, उत्पत्तीही होणार नाहीं, आणि कांहींच होणार नाहीं. मनुष्याच्या शक्तीच्या स्वभावधर्माचा निश्चय करणाऱ्या दोन शक्तींमधील हा फरक आहे. ह्या शक्तींपैकीं कित्येक शक्ति कर्म करतांना बंधनांकडे वळतील, आणि दुसऱ्या कितीएक मुक्ततेकडे वळतील.

०

चक्रांत चक्र गुंतून ह्या जगाचें मोठें भयंकर यंत्र तयार झालेलें आहे. आह्मीं जर त्यांत हात घातला, तर त्यांत तो सांपडेल आणि आह्मी सारेच्या सारेच नाहींसे होऊन जाऊं. आपणां सर्वांस वाटतें कीं, आमचें एखादें विविक्षित कर्तव्य आह्मीं केलें, तर मग

आह्मी निवांत बसूं. पण हा कर्तव्याचा भाग आह्मी पार पाडण्यापूर्वींच त्याचा दुसरा भाग तिष्ठत बसलेला असतो. आह्मी सर्व प्राणी ह्या प्रचंड घोंटाळ्याच्या जगद्रूप यंत्रानें ओढले जात आहोंत. त्यांतून बाहेर पडण्याला दोनच मार्ग आहेत. एक मार्ग हा कीं, त्या यंत्राची अजिबात काळजी सोडून देऊन त्यास टाकून अलग उभें राहणें किंवा आमच्या सर्व इच्छेचा त्याग करणें. हें बोलणें फार सोपें आहे. पण करावयाला बहुतेक अशक्यच आहे. मला नाहीं वाटत कीं, जगांतील लक्ष मनुष्यांतून एकाला तरी, तें करतां येईल. दुसरा मार्ग ह्मणजे हा कीं, जगांतच बुडी देऊन रहावें आणि कर्मांतील गुह्य शिकावें. आणि तोच कर्मयोगाचा रस्ता. जगद्यंत्राच्या चक्रापासून दूर पळूं नये, तर त्याच्या आंतच बसावें, आणि कर्मांतील मर्म समजून घ्यावें. आंतील कर्म योग्य रीतीनें करतां आलें, तर बाहेरही पडतां येईल. मग हें यंत्र आपणच तुह्मांला बाहेर येण्याला मार्ग करून देईल.

कर्म ह्मणजे काय, तें आह्मांस समजून चुकलें

आहे. तो सृष्टिधर्माच्या पायाचा एक भाग असून सदोदित चालू असणारा आहे. परमेश्वरावर भरंवसा ठेवणारे आहेत त्यांना हें चांगलें समजतें. कारण, त्यांना माहित असतें कीं, परमेश्वर कांहीं इतका दीनदुबळा प्राणी नाहीं कीं, त्याला आमच्या मदतीची जरूर लागेल. हें ब्रह्मांड जरी सारखें चाललें आहे तरी, आमचा हेतु मुक्त होण्याचा आहे. आमचा हेतु स्वार्थत्यागी बनावयाचा असतो. आणि कर्मयोगाप्रमाणें तें फल कर्माच्या द्वारें प्राप्त होत असतें. जगाला निखालस सुखी करण्याच्या साऱ्या कल्पना, देवभोळ्या लोकांस स्फूर्ति येण्याला चांगल्या असतील. परंतु हें आह्मीं ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, तो देवभोळेपणा जितकें चांगलें, तितकेंच वाईटही उत्पन्न करतो. कर्मयोगी ह्मणतो कीं, मुक्त होण्याची आपल्यामध्यें जी अंतर्गत आवड आहे, तिच्याहून निराळ्या शक्तीची, कर्म करण्याच्या कामांत अपेक्षा काय ह्मणून करतां? साधारण ऐहिक शक्तीच्या पलीकडे असा. " कर्म करण्याचा तुमचा हक्क आहे; परंतु

त्याच्या फलाचा तुह्मांला हक्क नाहीं." कर्मयोग ह्मणतो कीं, तें कसें करावें हें मनुष्यासच कळेल, आणि त्याचा अभ्यासही पण करतां येईल. चांगलें करण्याची कल्पना जेव्हां प्राणाचाच एक अंश होऊन राहते, तेव्हां त्याला बाहेरची कोणतीच शक्ति हुड-कावी लागत नाहीं. चांगलेंच करीत रहा. कारण, सत्कृत्य करणें हें चांगलें आहे. कर्मयोगी ह्मणतो कीं, स्वर्ग मिळविण्यासाठीं ह्मणून जरी कोणीं कर्म केलें, तरी तो बद्ध होतो. कारितां तें कर्मही हलक्या प्रतीचें होय. थोडासा स्वार्थीपणा ठेवून जरी कर्म झालें, तरी तें आह्मांस मुक्त न करितां आमच्या पायांत एक अधिक सांखळी मात्र अडकवितें. ह्या-करितां कर्मांचीं फलें टाकून देण्याला एकच मार्ग आहे. तो हा कीं, त्याशीं आसक्त असूं नये. हें जग ह्मणजे कांहीं आह्मी नव्हे; आणि आह्मी ह्मणजे कांहीं जग नव्हे, हें ध्यानांत ठेवावें. आह्मी खरोखर शरी-रही नव्हे आणि आम्ही खरोखर कर्मही पण करीत नाहीं. आम्ही परमात्मा आहों; शाश्वतचे शांत आणि

निर्विकार आहों. आम्ही कोणत्या तरी वस्तूला बांधलेले काय ह्मणून असावें ? आम्ही शोक करूं नये; कारण आत्म्याला कांहीं शोक नाहीं. आम्ही करुणेसाठीं सुद्धां रडूं नये. अशा गोष्टी आम्हांला आवडतील आणि आमची कल्पना तिकडे धांवेल, तर परमेश्वरच आपल्या सिंहासनावर बसून रडतो असें होईल. ईश्वरानें काय ह्मणून रडावें ? रडणें हें दुर्बळपणाचें; आणि बंधनाचें लक्षण आहे. आह्मी निखालस अलिप्त असावें, हें बोलावयाला फार छान आहे, पण तसें व्हावयाला मार्ग कोणता ? नवी सांखळी बांधून घेण्याऐवजीं, दुसऱ्या कोणत्याही शक्तीशिवाय, आम्ही प्रत्येक सत्कर्मच करूं लागलों, तर तें अस्तित्वाच्या सांखळींतील एक एक दुवा तोडील. कांहींही परत घेण्याचा विचार मनांत न आणतां, आम्ही जो सद्विचार जगाकडे पाठवितों, तो तेथें सांठून राहतो आणि एका सांखळींतील एक दुवा तोडतो. आणि आम्हांला मनुष्यांमध्यें अत्यंत पवित्र होईपर्यंत अधिक पवित्र पवित्रच करतो. तथापि हें सारें कृ-

तीहून कांहींसें विलक्षण, फार शास्त्रीय, आणि अधिक सोपपत्तिक दिसतें. भगवद्गीतेवर विरुद्ध आक्षेप घेतलेले मीं पुष्कळ वाचलेले आहेत. आणि पुष्कळ लोक म्हणालेही आहेत कीं, कोणत्या तरी स्फूर्तीशिवाय तुम्हांला कर्म करतां येणार नाहीं. देवभोळेपणाच्या प्रवाहाशिवाय, त्यांनीं स्वार्थत्यागी कर्म कधीं पाहिलेंलेंच नाहीं, म्हणून ते तशा रीतीनें बोलतात.

आतां सरतेशेवटीं हा कर्मयोग ज्यानें यथोचित रीतीनें प्रचारांत आणला, त्या एका मनुष्याविषयीं मी चार शब्द सांगतों. तो मनुष्य म्हणजे बुद्ध हा होय. ह्या एकाच मनुष्यानें हा कर्मयोग बरोबर प्रचारांत आणला; त्यानेंच त्याचा अभ्यास केला; एक बुद्ध खेरीज करून साऱ्या धर्मसंस्थापकांनीं स्वार्थत्यागी कृत्यें करण्याला बाह्य शक्ति घेतल्या होत्या. हा एक खेरीज करून बाकीच्या धर्मसंस्थापकांचे दोन पंथ करतां येतील. एक पंथाचें मत आपण ईश्वराचा अवतार घेऊन पृथ्वीवर आलों आहोंत. आणि दुसरे ह्मणत आम्हांला

ईश्वरानें दूत पाठविलें आहे. आणि ते दोघेही कर्म करण्याला बाहेरचा जोर घेत. आणि ते जरी अत्युच्च अध्यात्मिक भाषण करीत तरी त्यांस बाहेरच्या बक्षिसाची अपेक्षा असे. परंतु बुद्धाचा धर्म मात्र असा होता कीं, तो ह्मणे "परमेश्वराविषयींच्या तुमच्या कल्पना कितीही असल्या तरी, त्या समजून घेण्याची मी पर्वा करीत नाहीं. आत्म्याविषयींच्या वाग्पांडित्याचा व वाटाघाटीचा उपयोग काय? चांगलें करा; आणि चांगले व्हा. ह्याच्याच योगानें तुह्मांला मुक्ति मिळेल, आणि तेथें जें काय सत्य आहे त्याचा लाभ होईल." त्याचा सर्व जन्म असा होता कीं, त्याला व्यक्तिसामर्थ्य ह्मणजे काय तें माहितच नव्हतें. तरी त्याच्यापेक्षां कोणत्या मनुष्यानें अधिक काम केलेलें आहे? इतिहासामध्यें सर्वांच्यावर उड्डाण केलेलें असें चरित्र कोणाचें आहे तें मला दाखवून द्या. सर्व मानवजातीमध्यें अशा प्रकारचें जीवनचरित्र एकच आहे. केवढें श्रेष्ठ शास्त्र! किती दांडगी कळकळ! हा महा तत्ववेत्ता अत्युच्च

शास्त्राचा उपदेश करतांना अतिक्षुद्र जीवांची सुद्धां कळकळ बाळगित होता, आणि आपल्याकरितां कांहींच इच्छित नव्हता. कोणत्याच अहंकाराशिवाय जो कर्म करतो, तोच कर्मयोगाची मूर्ति होय. आणि तीच मानवजातीमध्यें अत्यंत थोर पुरुष जन्मास आला ह्मणून दाखविते. तो नेहेमीं दृष्टीस पडणाऱ्या अत्यंत उच्च अंतःकरणाच्या आणि मेंदूच्या एकत्रतेच्याही पलीकडचा. त्याच्यामध्यें अत्यंत प्रचंड आत्मशक्ति प्रगट झालेली असते. जगामध्यें पहिली सुधारणा करणारा तोच असें दिसून येतें. तोच पहिल्या प्रतीचा होता. आणि त्यानेंच असें ह्मणण्याचें धाड्स केलें कीं "कांहीं जुने लेख सांपडलेले आहेत; एवढ्यावरच विश्वास ठेवूं नका. आमच्या देशांतील सारे लोक विश्वास ठेवतात ह्मणूनच किंवा ही विश्वास ठेवण्याची संवय आह्मांला लहानपणापासून जडलेली आहे इतक्याच सबबीवरही विश्वास ठेवूं नका; तर ह्याचा सर्व बाजूनें नीट विचार करून, त्याची चांगली शहानिशा झाली ह्मणजे मग ह्यापासून एकाचें

किंवा सर्वांचेंही हितच होईल अशी तुमची खातरजमा होईल तरच विश्वास ठेवा; त्याचा स्वीकार करा; आणि दुसऱ्याला स्वीकार करतांना मदत करा." द्रव्य, कीर्ति, किंवा दुसऱ्या कशाचीच गरज न ठेवितां, जो कोणताही आपस्वार्थीपणाचा हेतु सोडून कर्म करतो, तोच अत्युत्तम कर्म करणारा होय. हें जेव्हां एखादा मनुष्य करूं शकेल, तेव्हांच तो बुद्ध होईल, आणि त्याच्या पासून कर्म करणाऱ्याला लौकरच असें सामर्थ्य उत्पन्न होईल कीं, तो सर्व जगाची उलथापालथ करूं शकेल. तोच मनुष्य कर्मयोगाचा मूर्तिमंत पुतळा होय.

**कर्मयोग समाप्त.**